गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील जनसामान्यांचे हक्काचे व्यासपीठ

Epaper-www.lokjan.com

मराठी दैनिक

लोकजन

मुख्य संपादक– दिलीप एच. पारधी

घराचे कुलूप तोडून एक लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

गोंदिया :– सडकमधील प्रगती कॉलनी येथे घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले सुमारे पाच तोळे वजनाचे जुने सोन्याचे दोन बांगड्या, किंमत एक लाख रुपये, चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तक्रारदार महिला संज्योती बबन कांबळे (५६) यांनी माजी पती बबन रामदासजी कांबळे यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ११.३० वाजतादरम्यान ही चोरी झाली. तक्रारीवरून ३१ ऑक्टोबर रोजी डुग्गीपार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश शेजाळ करीत आहेत.

मोबाइलमधील डेटा चोरून महिलेची बदनामी

गोंदिया :– मोबाइलमधील वैयक्तिक फोटो व व्हिडिओ चोरून महिलेची बदनामी केल्याचा प्रकार रामनगर परिसरात उघडकीस आला आहे. विद्युत दयानी (३५), रा. रामनगर, गोंदिया यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. २६ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने मोबाइलवरून संपर्क साधत न्यायालयीन प्रकरण मागे न घेतल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच मोबाइलमधील फोटो व व्हिडिओ चोरून मोबाइल हॅक केल्याची तक्रार आहे. याप्रकरणी ३१ ऑक्टोबर रोजी रामनगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

► वर्ष 19 – ► अंक – 174 ► Reg. No. – MA HMAR/2008/26345 गोंदिया ► दि. 02 नोव्हेंबर 2026 सोमवार ► डाक पंजी. NPMFL/95/2025-2027 ► पृष्ठ 6 ► किंमत 3.00 रु

एक नजर देशावर....

✪ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लोकतंत्र बचाव' यात्रेतील सभेतून विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. विरोधकांकडून काढण्यात येणाऱ्या मोर्चावर फडणवीसांनी आक्षेप घेतला.

✪ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'इंदिरा गांधींचा नातू आता पुन्हा तेच घेऊन रस्त्यावर उतरला आहे. दारू तीच आहे, फक्त बॉटल बदलली आहे.

✪ संसद संपवा म्हणत रस्त्यावर निर्णय करा. ते संसद, निवडणूक आयोगाला शिव्या देतात. आता देशाच्या न्यायालयाला देखील शिव्या देत आहेत. हीच अराजकता आहे. असा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

✪ नवी दिल्ली:रामलीला मैदानात राहुल गांधी यांच्या नेतृत्वात इंडिया आघाडीचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनाची हाक दिली आहे.

✪ नवी दिल्ली:काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अचानक भाषण थांबवलं. त्यानंतर दोन–तीन नेते धावत पळत आले. भाषण देताना माईकमध्ये बिघाड झाल्याने मल्लिकार्जुन खर्गे यांनी भाषण थांबवलं.

✪ इंडिया आघाडीच्या महारॅलीला सर्व पक्षीय नेत्यांनी हजेरी लावली आहे. या महारॅलीत काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी पंतप्रधान मोदींना पदावरून हटवण्याचा नारा दिला.

ओबीसींचा डाटा नाही तर वाटाही नाही; गोंदियात ओबीसींचा विराट महामोर्चा जातनिहाय जनगणनेसाठी हुंकार

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :– 'ओबीसींचा डाटा नाही तर वाटाही नाही' आणि 'आपली लढाई आपणच लढावी' या ठाम निर्धारासह १ नोव्हेंबर रोजी गोंदिया शहरातील जयस्तंभ चौकात ओबीसी बांधवांचा भव्य महामोर्चा आयोजित करण्यात आला होता. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या या विराट आंदोलनात गोंदिया जिल्ह्यातीलहजारो ओबीसी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, तरुण व महिला उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. जनगणनेमध्ये अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी) या संवर्गाप्रमाणेच ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम का समाविष्ट केला जात नाही? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. देशात सर्व घटकांची स्वतंत्र मोजदाद होत असताना बहुसंख्य



असलेल्या ओबीसी घटकाची जातनिहाय जनगणना करण्यास शासन टाळाटाळ का करत आहे, याबद्दल रोष व्यक्त करण्यात आला. आंदोलनात सहभागी ओबीसी बांधवांनी जातीनिहाय जनगणनेनी हुंकार देत लढा तीव्र करण्याचा इशारा दिला.

केंद्र सरकारकडून जातीनिहाय जनगणना केली जात आहे. मात्र या जनगणनेत ओबीसींवर अन्याय के ला. इतर प्रवर्गाप्रमाणे ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्याने जनगणनेच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. देशात सर्वाधिक संख्येत असलेले ओबीसींवर जाणून अन्याय केला जात असल्याचा आरोप ओबीसी संघटनांच्या वतीने करण्यात आला आहे.

देशात जंगलातील पशू, पक्षी आणि प्राण्यांची स्वतंत्र गणना होऊन त्यांचे संवर्धन केले जाते; मात्र माणूस म्हणून जन्माला आलेल्या देशातील ५० टक्क्यांहून अधिक ओबीसींची गणना न करणे हा संविधानाने दिलेल्या हक्कांवर मोठा अन्याय आहे, असा घणाघाती सूर यावेळी उमटला. आतापर्यंत स्वतःच्या हक्कांबाबत अनभिज्ञ राहून आम्ही अनेक पिढ्या खपवल्या. आता कुणीतरी मसिहा येईल आणि आमची लढाई लढेल, हा भ्रमाचा भोपळा फुटला आहे. सर्वांनाच स्वार्थ चिकटलेला असल्याने आता ओबीसींनी स्वतः रस्त्यावर उतरून ही लढाई जिंकलीच पाहिजे, असा एल्गार मोर्चेकऱ्यांनी केला.

जयस्तंभ चौक येथून महामोर्चाला सुरूवात झाली. 'जय ओबीसी' च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण गोंदिया शहर दणाणून गेले होते. टाळाटाळची भुमिका सोडून शासनाने ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

हा भव्य महामोर्चा यशस्वी करण्यासाठी सकल ओबीसी महामोर्चाचे संयोजक उमेश

पृष्ठ क्र.६ वर....

'उठ ओबीसी राजा उठ!' आवाहनाने परिसर दणाणला

उठ ओबीसी राजा उठ! तुझ्या उठण्याकडे कुटुंब, समाज आणि संपूर्ण ओबीसी संवर्गाचे भवितव्य डोळे लावून बसले आहे,' या आवाहनाने तरुणांमध्ये नवा जोश भरला. जयस्तंभ चौकात जमलेल्या जनसागराने दिलेल्या 'जय ओबीसी'च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण गोंदिया शहर दणाणून गेले होते. अत्यंत शांततेत व लोकशाही मार्गाने पार पडलेल्या या मोर्च्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून घेत जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरण्यात आली. जोपर्यंत जातनिहाय जनगणना होणार नाही, तोपर्यंत बहुसंख्यक ओबीसी स्वस्थ बसणार नाही, असा इशारा शासनाला देण्यात आला.

वनरक्षक उमेश काळसर्पे यांची राष्ट्रीय सन्मानासाठी निवड!

नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा गौरव; महाराष्ट्रातून 'वन्यजीव निरीक्षण व विशेष कौशल्य' श्रेणीत मिळिवले स्थान

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :– वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील वनरक्षक उमेश भारत काळसर्पे यांची राष्ट्रीय स्तरावरील सन्मानासाठी निवड झाली आहे. नवेगाव पार्क परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या काळसर्पे यांच्या या यशामुळे गोंदिया जिल्ह्यासह महाराष्ट्र वन विभागाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या वन्यजीव विभागाने गठित



केलेल्या राष्ट्रीय निवड समितीच्या ७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत देशभरातून प्राप्त नामांकनांची छाननी करण्यात आली. त्यातून विविध श्रेणींमध्ये केवळ आठ व्यक्ती, समूह आणि संस्थांची निवड करण्यात आली.

यामध्ये काळसर्पे यांनी 'क्षेत्रीय वन कर्मचारी – वन्यजीव निरीक्षण व विशेष कौशल्य' या श्रेणीत महाराष्ट्रातून स्थान मिळिवले. नियमित वनगस्त, वन्यप्राण्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि संरक्षणाच्या आव्हानात्मक जबाबदाऱ्या पार पाडणे, या त्यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

या निवडीबद्दल व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक पीयूषा जगताप, उपसंचालक प्रीतमसिंह कोडपे आणि विभागीय वनाधिकारी अतुल देवकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन

पृष्ठ क्र.६ वर....

महिलांच्या हातात स्थानिक स्वराज्य सत्तेची चावी देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्नशील – प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे

जिल्ह्यातील महिला नेतृत्वाला संधी देऊन पक्ष संघटना अधिक मजबूत करू – खा. राजेंद्र जैन

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया:– राष्ट्रवादी काँग्रेस भवन रेलटोली, जनसंपर्क कार्यालय, गोंदिया येथे गोंदिया जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक रविवार ०१ नोव्हेंबर रोजी प्रदेशाध्यक्षा श्रीमती वैशालीताई नागवडे, खासदार राजेंद्र जैन, आ. राजकुमार बडोले, वरिष्ठ नेत्या श्रीमती आभाताई पांडे, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले, प्रदेश उपाध्यक्षा सौ.राजलक्ष्मी तुरकर, जिल्हाध्यक्षा सौ. रजनी गिऱ्हेपुजे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी संबोधित करतांना खा.राजेंद्र जैन म्हणाले कि, लोकप्रिय जननेता आदरणीय स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या प्रश्नांप्रती जिव्हाळा असलेला नेतृत्व हरपला आहे. खा. प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात भंडारा व गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विकासाच्या धोरणांवर काम करीत असून स्थानिक स्वराज्य असो किंवा सहकार क्षेत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अग्रेसर आहे. पक्षात काम करणाऱ्यांना संधी दिली जात असून पक्षाप्रती निष्ठा व प्रामाणिकपणा ठेवला तर पक्ष खंबीरपणे पाठीशी उभा आहे याची जाणीव कार्यकर्त्यांना आहे. येणाऱ्या काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या



निवडणूका असून महिलांच्या नेतृत्वाला संधी देण्याचे काम पक्ष करणार आहे.

महिला प्रदेशाध्यक्षा श्रीमती वैशालीताई नागवडे यांनी महिलांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या कि, आदरणीय लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने कधीही भरून न निघणारी पक्षाची हानी झाली आहे. आदरणीय दादांच्या स्वप्नांची पूर्ती करणे आपली सर्वांची जिम्मेदारी आहे. त्यामुळे पक्ष संघटनेत महिलांचे नेतृत्व वाढविण्यासाठी आपल्याला मेहनत घ्यावी लागणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांचा हातात सत्तेची चाबी असावी यादिशेने प्रयत्न करावे लागेल. सुनेत्राताई पवार, खा.प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात पक्ष वाढीसाठी सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना आपला पक्षच मानाने स्थान देऊ शकते, कार्यकर्ता हा संघटनेचा कणा आहे आणि म्हणून महिला अनेक क्षेत्रात पुढे येत असल्या तरी ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निश्चितच काम करेल याची ग्वाही त्यांनी दिली. आ.राजकुमार बडोले यावेळी म्हणाले कि, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा

पृष्ठ क्र.६ वर....

कटंगीकला येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या स्थलांतरित शाखेचे खासदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते उद्घाटन

शेतकरी, महिला बचत गट आणि व्यावसायिकांना अधिक सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :– ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना चालना देण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कटंगीकला येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या स्थलांतरित शाखेचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. खासदार राजेंद्रजी जैन यांच्या शुभहस्ते या नूतन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या स्थलांतरामुळे परिसरातील नागरिकांना अधिक सुलभ, सोयीस्कर आणि ग्राहकाभिमुख बँकिंग सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या उद्घाटन सोहळ्याला आमदार विनोदजी अग्रवाल, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर वासनिक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष गिरीशजी थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बँकेचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उद्घाटनप्रसंगी खासदार राजेंद्र जैन यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात बँकिंग व्यवस्थेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यावसायिक, महिला बचत गट आणि सर्वसामान्य ग्राहकांना आर्थिक व्यवहारांसाठी सहज उपलब्ध होणाऱ्या बँकिंग सुविधांची आवश्यकता आहे. विशेषतः महिला सक्षमीकरणासाठी बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे त्यांनी कौतुक केले. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी अशा योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचविण्याची



अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. नूतन शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा मिळतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी बँकेचे अध्यक्ष गिरीश थोरात यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कार्याचा आढावा सादर केला. बँकेच्या विविध बचत व ठेव योजना, कृषी कर्ज, कृषीपूरक व्यवसायांसाठीच्या कर्ज योजना तसेच आधुनिक बँकिंग सुविधांची सविस्तर माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. ग्रामीण भागातील आर्थिक गरजा लक्षात घेऊन बँकिंग सेवा अधिक प्रभावी करण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक भागवत माळगे, उपक्षेत्रीय व्यवस्थापक नरेंद्र पटले, कटंगीकला शाखा व्यवस्थापक विकास बनोटे यांच्यासह अभिलेख अग्रवाल,

पृष्ठ क्र.६ वर....

बनावट सिमकार्डच्या माध्यमातून देशभरातील नागरिकांची १.५६ लाखांची फसवणूक!

एटीएस, एनआयए आणि दिल्ली पोलिसांच्या नावाने खोटा धाक; आमगाव पोलिसांत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :– बनावट सिमकार्डचा वापर करून देशभरातील नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करण्याचा प्रकार आमगाव पोलिसांच्या तपासातून समोर आला आहे. कमी किमतीत सिमकार्ड उपलब्ध करून देण्याच्या बहाण्याने ग्राहकांची फसवणूक करून सक्रिय सिमकार्ड सायबर गुन्हेगारीसाठी पुरविल्याचा आरोप तिघांवर करण्यात आला आहे. या प्रकरणात एकूण १ लाख ५६ हजार ७९८ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

आमगाव पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, आरोपी प्रवीण धनराज मेंढे (२१, शंभूटोला), मोनू शिवशंकर मटाले (१९, भोसा) आणि निरंजन मस्के (अंदाजे २३, तिरोडा) यांनी संगनमताने हा प्रकार केल्याचा आरोप आहे.

आरोपींकडून काही ग्राहकांना कमी किमतीत सिमकार्ड देण्यात



आले. मात्र, सिमकार्ड वितरणाची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचे खोटे सांगून सक्रिय सिमकार्ड ग्राहकांना न देता स्वतःकडे ठेवण्यात आले. त्यानंतर ही सिमकार्ड अन्य आरोपींच्या माध्यमातून पुढे पाठविण्यात आली. या सिमकार्डचा वापर सायबर गुन्हेगारीसाठी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या सिमकार्डच्या आधारे देशभरातील नागरिकांना ऑनलाइन माध्यमातून डिजिटल अटक, आर्थिक फसवणूक, ई-आय सॉफ्टवेअर सबस्क्रिप्शन खरेदीच्या नावाखाली फसवणूक तसेच एटीएस, एनआयए आणि दिल्ली पोलिसांच्या नावाने खोटा धाक दाखविण्याचे प्रकार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(४), ३१९, ६१(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर ३० ऑक्टोबर रोजी गुन्ह्याची नोंद

पृष्ठ क्र.६ वर....

विचारधन:– जिथे मोल जाणत नाही तिथे शब्द टाकू नये.

संपादकीय...

नेतान्याहूंची कसोटी

इस्रायलच्या निवडणुकीने देशातील राजकारणाला नवे वळण दिले आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या आघाडीला अपेक्षित बहुमत मिळाले नाही. मात्र, त्यांना सत्तेतून दूर करण्यासाठी एकत्र आलेल्या विरोधकांनाही सरकार स्थापन करणे सोपे नाही. सुरुवातीच्या अंदाजांत नेतान्याहू यांच्या आघाडीला मोठा धक्का बसल्याचे चित्र होते; पण मतमोजणी पुढे सरकताच त्यांच्या आघाडीने पुन्हा जोर धरला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. सुरुवातीचे अंदाज आणि अंतिम निकाल यात फरक असू शकतो. त्यामुळे सरकार कोणाचे बनणार, हे ठरवताना अंतिम निकाल आणि घटनात्मक प्रक्रिया यांनाच महत्त्व द्यावे लागेल. नेतान्याहू यांना विरोध करण्यासाठी अनेक पक्ष एकत्र आले आहेत; पण त्यांच्यातील मतभेदही मोठे आहेत. नेतान्याहू यांना सत्तेतून हटवणे हा त्यांना जोडणारा एकमेव मुद्दा असेल, तर सरकार चालवणे कठीण जाईल. देशाचा कारभार केवळ विरोधाच्या बळावर चालत नाही. राष्ट्रीय सुरक्षा, संरक्षण, अर्थव्यवस्था आणि देशाच्या भवितव्याबाबत ठोस भूमिका असावी लागते. विरोधकांकडे एकत्रितपणे जास्त जागा असल्या, तरी त्यांचे स्थिर सरकार बनेलच असे नाही. नेतान्याहू यांच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करताना इस्रायलसमोरील सुरक्षा आव्हाने लक्षात घ्यावी लागतील. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्याने इस्रायलच्या सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या. हा हल्ला रोखण्यात आलेल्या अपयशाची चौकशी झालीच पाहिजे; पण त्यानंतर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीत देशाचे रक्षण करण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे. त्यामुळे नेतृत्व बदलण्याची मागणी आणि देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेले सातत्य, या दोन्ही गोष्टींचा विचार करावा लागेल. नेतान्याहू यांच्या धोरणांवर टीका होऊ शकते. त्यांच्या नेतृत्वातील चुका तपासल्या गेल्या पाहिजेत; पण त्यामुळे त्यांच्या प्रत्येक भूमिकेला सरसकट नाकारता येणार नाही. राष्ट्रीय सुरक्षेबाबत कठोर भूमिका आवश्यक असल्याचे त्यांच्या समर्थकांना वाटते. त्यामागील कारणेही समजून घ्यायला हवीत. दहशतवादाचा धोका असलेल्या देशात संरक्षणाचे निर्णय केवळ पक्षीय राजकारणातून घेता येत नाहीत. देशाची परिस्थिती, उपलब्ध पर्याय आणि भविष्यातील सुरक्षितता यांचा विचार करूनच त्यांचे मूल्यमापन झाले पाहिजे. या निवडणुकीत अरब–पॅलेस्टिनी नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान केल्याचे चित्र आहे. इस्रायलच्या लोकसंख्येत या समुदायाचा वाटा सुमारे एक पंचमांश आहे. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग महत्त्वाचा आहे. त्यांच्या मतांचा आदर राखलाच पाहिजे. मात्र, सरकार स्थापनेत अरब पक्षांची भूमिका निर्णायक ठरू शकते. अशा वेळी विरोधक त्यांच्याशी कोणत्या अटीवर चर्चा करतात, हेही महत्त्वाचे ठरेल. विशेषतः संरक्षण आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत संभाव्य सरकारची भूमिका काय असेल, हे जनतेला स्पष्ट झाले पाहिजे, नेतान्याहू यांच्या लिकुड पक्षाने निवडणुकीतील कथित गैरव्यवहार आणि परकीय हस्तक्षेपाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, या आरोपांना अद्याप ठोस पुरावा मिळालेला नाही. त्यामुळे त्यांना सिद्ध तथ्य मानता येणार नाही. तरीही निवडणुकीवर वाह्य शक्तींचा प्रभाव पडला का, हा प्रश्न उपस्थित झाला असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी व्हायला हवी. निवडणूक आयोग आणि संबंधित यंत्रणांनी पुराव्यांच्या आधारे सत्य समोर आणावे. आरोप निराधार असतील, तर ते स्पष्ट व्हावे. गैरव्यवहार आढळल्यास कायद्यानुसार कारवाई व्हावी. लोकशाहीवरील विश्वास टिकवण्याचा हाच मार्ग आहे. या प्रकरणात नेतान्याहू यांच्या पक्षाचे दावे आणि विरोधकांचे आरोप, या दोन्हींकडे संयमाने पाहायला हवे. निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून गैरव्यवहार झाल्याचे सिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे, सत्ताधारी पक्षाने आरोप केले म्हणून ते निराधारही ठरत नाहीत. राजकीय दाव्यांपेक्षा पुरावे महत्त्वाचे असतात. त्यामुळे या मुद्द्याचा राजकीय फायदा घेण्यापेक्षा सत्य समोर आणण्याला प्राधान्य दिले पाहिजे. निवडणुकीतून इस्रायलमधील आणखी एक वास्तव समोर आले आहे. देशात मतभेद असले, तरी उजव्या विचारांचे राजकारण अजूनही प्रभावी आहे. नेतान्याहू यांच्या आघाडीसह अविग्दोर लिबरमन आणि नफ्ताली बेनेट यांच्या पक्षांकडे असलेल्या जागाही याकडे लक्ष वेधतात. त्यामुळे इस्रायलच्या राजकारणाची दिशा केवळ नेतान्याहू यांच्या लोकप्रियतेवर ठरत नाही. राष्ट्रवाद, राष्ट्रीय सुरक्षा आणि देशाच्या भवितव्याबाबतच्या भूमिकांनाही मतदारांनी महत्त्व दिले आहे. नेतान्याहू यांच्यासाठी ही निवडणूक कसोटीची ठरणार आहे. बहुमतासाठी आवश्यक पाठिंबा मिळवून स्थिर सरकार देण्याची क्षमता त्यांना दाखवावी लागेल; पण विरोधकांची जबाबदारीही कमी नाही. केवळ नेतान्याहू यांना हटवण्याची घोषणा करून भागणार नाही. त्यांच्याकडे पर्यायी धोरणे, सक्षम नेतृत्व आणि टिकाऊ सरकारची योजना असावी लागेल. अन्यथा, वेगवेगळ्या विचारांचे पक्ष एकत्र आल्याने देशात राजकीय अस्थिरता वाढू शकते. इस्रायलसमोरील प्रश्न केवळ संसदेतील जागांच्या आकड्यांपुरते मर्यादित नाहीत. राष्ट्रीय सुरक्षा, युद्धाचे परिणाम, नागरिकांचा विश्वास आणि समाजातील वाढती दरी ही मोठी आव्हाने आहेत. नेतान्याहू यांच्या समर्थकांना त्यांच्या नेतृत्वाकडून स्थैर्य आणि सुरक्षिततेची अपेक्षा असेल, तर ती पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. विरोधकांनीही जनमताचा आदर राखून पर्यायी सरकार किती व्यवहार्य आहे, हे दाखवून द्यायला हवे. लोकशाहीत कोणत्याही करून देशाचे प्रश्न सुटत न नेत्याला कायम सत्तेवर राहण्याचा अधिकार नसतो; पण त्याला सत्तेतून दूर करायचे असेल, तर विरोधकांकडे स्पष्ट बहुमत आणि सक्षम पर्यायही हवा. नेतान्याहू यांची कारकीर्द वादग्रस्त असली, तरी त्यांचे राजकीय भवितव्य ठरवताना आरोपांपेक्षा पुरावे आणि घोषणांपेक्षा धोरणे महत्त्वाची आहेत. केवळ सत्तेची आकडेमोड करून देशाचे प्रश्न सुटत नाहीत. इस्रायलला आज स्थिर सरकारची गरज आहे.

मांझ गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत जांभुरटोला येथील ४६ नागरिकांची ग्रामीण रुग्णालय आमगाव येथे मोफत एक्स-रे तपासणी

दै. लोकजन वृत्तसेवा

आमगाव:– केंद्र व राज्य शासनाच्या 'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत १०० दिवसीय अभियान' तसेच 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान' अंतर्गत आमगाव तालुक्यातील तिगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या तिगाव आयुष्यमान आरोग्य मंदिर कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत जांभुरटोला अंतर्गत पिपरटोला येथे विशेष आरोग्य मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत आरोग्य पथकाच्या प्रयत्नांमुळे परिसरातील एकूण ४६ वयोवृद्ध तसेच सहव्याधी आजार नागरिकांना क्षयरोग (टीबी) स्क्रीनिंग व एक्स-रे तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय आमगाव येथे रुग्णवाहीकेतुन पाठविण्यात आले. ग्रामीण भागातून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन व्हावे आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या अभियानात आरोग्य विभागाने पद्धतशीर नियोजन केले होते.

सदर मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार आणि आमगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांच्या संकल्पनेतुन व प्राथमिक आरोग्य केंद्र तिगाव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. तुलसी भगत यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पार पडली. आयुष्मान आरोग्य मंदिर तिगाव येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रीती चव्हाण, आरोग्य सेवक एस.एस. देशकर आणि आशा सेविका शारदा खोब्रागडे यांनी ग्रामपंचायत जांभुरटोला अंतर्गत पिपरटोला गावात गृहभेटी दरम्यान सर्वेक्षण व तपासणी केले.

आपले गाव टीबीमुक्त आणि आरोग्य संपन्न करण्यासाठी आयुष्मान आरोग्य मंदिर तिगाव आरोग्य पथकाने घरोघरी जाऊन गरजू व संवेदनशील रुग्णांचा शोध घेतला आणि त्यांना तपासणीसाठी प्रोत्साहित केले. दुर्गम भागातील नागरिकांना रुग्णालयापर्यंत येण्यासाठी वाहतुकीची अडचण भासू नये, म्हणून रुग्णवाहिकेची विशेष सोय करण्यात आली होती. रुग्णवाहिका चालक भेषमन शिवणकर यांनी सर्व नागरिकांना सुरक्षितपणे ग्रामीण रुग्णालय आमगाव येथे पोहोचवले. रुग्णालयात पोहोचल्यानंतर सर्व ४६ नागरिकांची तज्ज्ञांच्या देखरेखीखाली मोफत डिजिटल एक्स-रे आणि आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आली.



डॉ. प्रीती चव्हाण यांचे क्षयरोगाबाबत नागरिकांना आवाहन:–

या मोहिमेदरम्यान समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रीती चव्हाण यांनी उपस्थितांना क्षयरोगाविषयी (टीबी) मोलाचे मार्गदर्शन केले. 'दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला असणे, संध्याकाळी ताप येणे, वजन कमी होणे किंवा भूक मंदावणे ही क्षयरोगाची प्राथमिक लक्षणे असू शकतात. अशी लक्षणे आढळल्यास ती लपवून न ठेवता त्वरित जवळच्या आयुष्मान आरोग्य मंदिराशी संपर्क साधावा,' असे आवाहन त्यांनी केले. क्षयरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेत निदान आणि नियमित उपचार हाच यावरील एकमेव उपाय असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा आरोग्य प्रशासन व तालुका आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्र तिगाव आणि ग्रामीण रुग्णालय आमगावच्या या संयुक्त उपक्रमामुळे नागरिकांना गावातून थेट रुग्णालयापर्यंत विनामूल्य आरोग्य सेवा मिळाली, ज्याबद्दल जांभुरटोला व पिपरटोला येथील नागरिकांनी संपूर्ण आरोग्य चमूचे मनापासून आभार मानले आहेत.

गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा उत्साहात शुभारंभ; २७ ऑक्टोबर रोजी विविध शाळा व अंगणवाड्यांमध्ये अभियानाला सुरुवात

दै. लोकजन वृत्तसेवा

गोंदिया:– मुलांच्या पोटातील जंतांचा संसर्ग कमी करून त्यांचे आरोग्य व पोषण सुधारण्यासाठी राबवली जाणारी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम २७ ऑक्टोबर रोजी गोंदिया जिल्ह्यात अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. या मोहिमेच्या अंतर्गत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अभियानाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला.

तालुकानिहाय मोहिमेचा शुभारंभ:

● **आमगाव तालुका:–** जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्या हस्ते आमगाव तालुक्यातील 'विद्या निकेतन कनिष्ठ महाविद्यालय' तसेच 'जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळा, अंजोरा' येथे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा रीतसर शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांचे सोबत आमगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरगडे, जिल्हा परिषद सदस्य छबु उके, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र बनगाव डॉ. भुमेश्वर पटले, प्राचार्य ए.डी. सिंग उपस्थित होते सोबत कम्युनिटी हेल्थ ऑफिसर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अशाताई, व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

● **सडक अर्जुनी तालुका:–** अभियानाच्या अनुषंगाने राज्य नोडल अधिकारी तथा नागपूर येथील प्रादेशिक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. श्रीराम गोगुलवार यांनी सडक अर्जुनी येथील 'अंगणवाडी केंद्र क्रमांक ३' आणि 'जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक कनिष्ठ विद्यालय, सडक अर्जुनी' येथे उपस्थित राहून मोहिमेचे उद्घाटन केले. यावेळी त्यांचे सोबत सडक अर्जुनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रणित पाटील उपस्थित होते.

● **गोरेगाव तालुका:–** अभियानाच्या अनुषंगाने सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे यांनी गोरेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कुल गोरेगाव येथे उपस्थित राहून मोहिमेचे उद्घाटन केले. यावेळी त्यांचे सोबत जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे उपस्थित होते.

● **सालेकसा तालुका:–** जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. राजेश बेळमकर



यांच्या मार्गदर्शनाखाली सालेकसा तालुक्यातील 'पी.एम.श्री.जि.प. वरिष्ठ प्राथमिक आदर्श पाठशाळा, झालिया' येथे या महत्त्वपूर्ण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. यावेळी त्यांचे सोबत सालेकसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमित खोडणकर उपस्थित होते.

मोहिमेचे उद्दिष्ट–

१ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतसंसर्गापासून मुक्त करणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट होते.जंतांमुळे मुलांमध्ये होणारा अशक्तपणा (रक्तक्षय), पोषण कमी होणे आणि शारीरिक वाढ खुंटणे यासारख्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ही मोहीम अत्यंत मोलाची ठरली. २७ ऑक्टोबर रोजी अनुपस्थित राहिलेल्या बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी 'मॉप-अप दिन' आयोजित करून वंचित राहिलेल्या मुलांना जंतनाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत.

अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचा तिरोडा येथे संघटनात्मक विस्तार, दोन महत्त्वपूर्ण नियुक्त्या

तिरोडा:–अखिल भारतीय क्षत्रिय महासभेने आपल्या संघटनात्मक विस्ताराला आणि सामाजिक कार्याला नवी गती देण्याच्या उद्देशाने तिरोडा येथे दोन महत्त्वपूर्ण नियुक्त्यांची घोषणा केली आहे. यानुसार अजयकुमार चंद्रकुमारसिंह तोमर यांची तिरोडा तहसील अध्यक्षपदी तर संजयसिंह सुरेंद्रसिंह बैस यांची तिरोडा शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक संजयसिंह बैस यांची शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने शहरात आनंदाचे वातावरण आहे. दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार कुंवर हरिवंश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ठाकूर पंकज सिंह यांच्या निर्देशानुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्यांना तिरोडा क्षेत्रात महासभेच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. अजयकुमार तोमर आता तिरोडा तहसीलमध्ये संघटनात्मक कामकाजाचे नेतृत्व करतील, तर संजयसिंह बैस शहर पातळीवर महासभेच्या कार्याला गती देतील. दोघांकडून समाजातील विविध घटकांना एका मंचावर आणणे, युवकांना संघटनेशी जोडणे आणि सामाजिक एकता मजबूत करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वांत अभिनंदन होत आहे.



समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांच्या जपणुकीतून समाजाच्या विकासासाठी एकत्र या – आमदार राजकुमार बडोले

तुमसर (तेढा) येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रबोधन कार्यक्रम

दै. लोकजन वृत्तसेवा

अर्जुनी-मोर.:– तुमसर (तेढा) येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित प्रबोधन कार्यक्रमाला अर्जुनी-मोर विधानसभा क्षेत्राचे आमदार इंजि. राजकुमार बडोले यांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी त्यांनी उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधत सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. समता, न्याय, बंधुता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारावर समाजाची एकजूट मजबूत करून विकासाच्या दिशेने सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. तथागत भगवान गौतम बुद्धांच्या शांतता, करुणा आणि मानवतेच्या शिकवणीचा अंगीकार करून समाजात सलोखा निर्माण करणे आवश्यक आहे. सामाजिक एकता, शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजाने प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करावी, असे मार्गदर्शन आमदार राजकुमार बडोले यांनी केले.

यावेळी उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधताना त्यांनी स्थानिक समस्या, गावाच्या विकासासंदर्भातील अपेक्षा आणि समाजसेवेच्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली. समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी परस्पर सहकार्य, एकजूट आणि सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. धम्माच्या विचारांतून प्रेरणा घेत सामाजिक बांधिलकी जपत विकासाच्या वाटचालीत सर्वांनी एकत्रितपणे योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



या कार्यक्रमाला पंचायत समितीचे उपसभापती रामेश्वर महारवाडे, भाजपा गोरेगावचे सचिव आनंद चंद्रिकापुरे, महेंद्र पारधी, राजु साखरे, तुमसरचे उपसरपंच विजय शहारे, माजी उपसरपंच अरविंद कोटंगले, माजी पंचायत समिती सदस्य धर्मशीला साखरे यांच्यासह अनेक मान्यवर, समाजबांधव आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार राजकुमार बडोले यांनी उपस्थित मान्यवर व समाजबांधवांचे आभार मानले, तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रबोधनाचा उपक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. सामाजिक एकता, बंधुता आणि प्रबोधनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांना कायदेविषयक हक्कांची माहिती; सायबर सुरक्षा व महिला संरक्षण कायद्यांवर जनजागृती

दै. लोकजन वृत्तसेवा

गोंदिया:– जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया यांच्या वतीने रामनगर येथील नूतन स्कूल आणि श्री छत्रपती शिवाजी राजे पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, पर्यायी वाद निवारण पद्धती, बालकांचे संरक्षण, महिलांचे कायदेशीर हक्क तसेच मोफत कायदेविषयक मदत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला दोन्ही शाळांतील सुमारे १५० ते २०० विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांच्या निर्देशानुसार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमात लोक अभिरक्षक कार्यालय, गोंदिया येथील उपलोक अभिरक्षक ॲड. सुजाता तिवारी यांनी पर्यायी वाद निवारण पद्धती (ADR), सायबर सुरक्षा, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची (NALSA) राष्ट्रीय विधी सेवा हेल्पलाइन व पोर्टल याविषयी माहिती दिली.

मोबाईल, संगणक, ऑनलाइन बँक खाते आणि वैयक्तिक माहिती सायबर गुन्हेगारांपासून सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

न्यायालयीन प्रक्रियेला पर्याय म्हणून सामोपचाराने वाद सोडविण्यासाठी मध्यस्थी (Mediation), समेट (Conciliation), लवाद (Arbitration) आणि लोकअदालत या पद्धतींचा उपयोग होतो. या माध्यमांमुळे वेळ व खर्चाची बचत होते, परस्पर संबंध टिकून राहण्यास मदत होते आणि वादातील तणाव कमी होतो, असेही त्यांनी सांगितले. तसेच गरजू नागरिकांना कायदेविषयक मदत मिळवून देण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पॅनेल वकील ॲड. अलका जे. उके यांनी बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण करण्यासाठीचा पॉक्सो कायदा (POCSO Act, 2012), समाजातील महिलांची सुरक्षितता व गोपनीयता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ आणि हुंडाबंदी कायदा यांविषयी मार्गदर्शन केले.



कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित व सन्मानजनक वातावरण मिळावे, यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१३ अर्थात झजडक अलीं मधील तरतुदी त्यांनी स्पष्ट केल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या Aureliano Fernandes विरुद्ध State of Goa या प्रकरणाच्या संदर्भात कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची तक्रार करण्यासाठी उपलब्ध असलेल्या डकए-इ पोर्टलची माहिती देतानाच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या १५१०० या हेल्पलाइन क्रमांकाबाबतही विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन स्कूलचे शिक्षक एस.एस. ठाकूर यांनी केले, तर व्ही.डी. बिसेन यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया येथील कर्मचारी आणि पॅरा लीगल व्हॉलंटियर्स (PLV) यांनी सहकार्य केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासह सायबर गुन्ह्यांपासून बचाव, बालसुरक्षा आणि महिलांच्या हक्कांविषयी माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात आला.

दैनिक **लोकजन** प्रस्तुत

फुल मनोरंजन

सु विचार

कोणतेच वेळ शुभ किंवा अशुभ नसते. माणूस आपल्या पराक्रमाने एखाद्या वेळेला महत्त्व आणून देतो.



तात्पर्य : एखाद्या चांगल्या गोष्टीत उत्तमिक दिशी, उत्तमिक वेळेचा मुहूर्त पाहून सुरुवात करणे योग्य नाही, बात अंधश्रद्धा असते. म्हणून मुहूर्त पाहिला जातो. आत्मविश्वास नसेल, तर मुहूर्त पाहावा लागतो. परंतु कर्तृत्ववान माणसे अशी वेळ काळ न पाहता एखादे महान कार्य करुन दाखवतात. अशा वेळी तेव वेळेला महत्व आपून देतात. म्हणजे शुभाशुभ हे महत्वाचे नाही, माणसाचे कर्तृत्व महत्वाचे आहे.

जशास तसे

एके दिवशी एक मापूस लोकमान्य टिळकांना भेटायास आला व म्हणाला, महाराज मी अत्यंत गरीब आहे व मोठ्या संकटात सापडलो आहे. मला पैशाची फार गरज आहे. पण काल रात्री देव माझ्या स्वप्नात आले व मला म्हणाला तू टिळकांच्याकडे जा, म्हणजे तुझी काळजी लवेच दूर होईल. म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. सध्या मला पाचशे रुपयांची गड आहे. तेवढे दिलेत तर संकटमुक्त होईन.

लोकमान्यांनी त्या माणसाकडे एकदा निरखून पाहिले.

हा मापूस पक्का लफंगा, लबाड आहे हे त्यांच्या लवेच लक्षात आले. मग ते त्या माणसाला म्हणाले, तुला देवाने स्वप्नात येऊन सांगितले खरे पण मला मुळे सांगितले आहे. ज्या देवाला तुझी इतकी काळजी आहे. त्याने माझ्या स्वप्नात येऊन सांगायास हवे होते की मी अमुक माणसाला तूमच्याकडे पाठवितो आहे. त्याला पाचशे रुपये द्या. पण जोपर्यंत तो देव मला तसे सांग करू शकत नाही. हे ऐकताच तो माणूस काही एक न बोलता तेथून गेला.


सु विचार माला

उपदेशक, विचारवंत व्हा, पण अगोदर आचारवंत व्हा!

प्रत्येक गोष्ट करताना सखोल विचार करावा, इतरांना आवश्यक तेथे उपदेशही करावा, त्याचा परिणाम इतरांवर जेवढा होतो, त्यापेक्षा आपण इतरांना जो उपदेश करतो, आपल्या मनाला जे चांगले म्हणून पटते, त्याप्रमाणे आपण वागावे, त्याचा परिणाम इतरांवर चांगला होतो. म्हणून कृतीला जास्त महत्त्व आहे.

- किचनमध्ये चुकूनसुद्धा पर्दे आदि टांगू नका
- सुती कपडे धालून किचनमध्ये काम करा.
- गॅसचे सिलेंडर शेगडीच्या खाली ठेवा.

शब्दशोध



आडवे शब्द

१) वरार
२) नवरदेव
३) पचणे
४) भाकीत
५) शनिवार
६) खर
७) धारावी
८) नमस्कार
९) अभद्र
१०) कान
११) वटीका
१२) विराट
१३) अनपेक्षित
१४) गज
१५) खडकाळ
१६) चन
१७) ताप
१८) कलरव
१९) अपरंपार
२०) बबुल
२१) टकळी
२२) परिवर्तन
२३) सुदा
२४) कोटर
२५) महारोग
२६) आधारवड
२७) अडत
२८) भार
२९) तनमनधन
३०)रजतपट

उभे शब्द

१) शीर
२) वंशपरंपरागत
३) वावरणे
४) ताप
५) करोड
६) कसम
७) भाव
८) तनमन
९) अचकटविचकट
१०) भवीष्यकाळ
११) रित
१२) टीकास
१३) रान
१४) खारकुज
१५) खबरदार
१६) अळी
१७) आधारवड
१८) पायर
१९) लतकोडगा
२०) सटरफटर
२१) पट
२२) सुधाचंद्रन
२४) खागत
२५) जन
२६) ताप
२७) अन
२८) भाव
२९) पेपरमिंट
३०) कीर्तनकार

फिल्मी शब्दकोडे

आडवे संकेत


१) सन १९९८ मध्ये 'डेविड धवन' दिग्दर्शीत गोविंदा आणि रम्भेचा चित्रपट
३) सन १९९५ मध्ये 'अजीज सेजवाल' दिग्दर्शीत गोविंदा, संजय दत्त आणि ममता कुलकर्णीचा चित्रपट.
७) जैकी श्रॉफ, मनिषा, कोईराला, अनिल कपूर, महिमा चौधरी आणि अजय देवगनचा चित्रपट.
८) 'जोर इस दिलने क्या रखा है तेरा ही....' ह्या गाण्याचा चित्रपट.
१०) इतनासा ख्वाब है. (चित्रपट)
१२) सन १९९२ मध्ये 'के. बाघ्या' दिग्दर्शीत ऋषी कपूर आणि जिलमचा चित्रपट
१५) राधा का (चित्रपट)
१६) सन १९९६ मध्ये 'डेविड धवन' दिग्दर्शीत गोविंदा, करिश्मा कपूर आणि तब्बुचा चित्रपट
१७) सावन का महिना करे शोर.
१८) मूराद (गायक)
१९) सन १९८९ मध्ये 'डेविड धवन' दिग्दर्शीत सनि देओल, डिम्पल कपाडीयाचा चित्रपट
२२) सन १९८७ मध्ये आलेला राजेश खन्ना, श्रीदेविचा चित्रपट
२४) सन १९९० मध्ये आलेला अनिल कपूर, माधूरी दिक्षीत आणि हेमामालिनीचा चित्रपट
२६) मिलन की रात (चित्रपट)
२९) जनम (चित्रपट)
३२) हिरो नंबर (चित्रपट)
३३) सन १९९२ मध्ये आलेल्या जैकी श्रॉफ, माधुरी दिक्षीत, विवेक मुश्राग, पुजा भटचा चित्रपट
३४) सन १९८८ मध्ये 'सुनिल हिंगोरानी' दिग्दर्शीत सनिदेओल आणि श्रीदेवीचा चित्रपट.

१) सन २००१ मध्ये 'गोल्डी बहल' दिग्दर्शीत ह्या चित्रपटात अभिषेक बच्चन आणि राणी मुखर्जी होते.
२) कैद मे है बुल (चित्रपट)
४) सन १९८० मध्ये 'राज खोसला' दिग्दर्शीत अमिताभ बच्चन आणि जिनत अमानचा चित्रपट
५) सन १९९८ मध्ये 'किर्ती कुमार' दिग्दर्शीत गोविंदा आणि ममत कुलकर्णीचा चित्रपट
६) 'मै तो हु मुंडा तु है मेरी सोनी कुडी....' ह्या गाण्याचा चित्रपट
९) द फायर (चित्रपट)
११) सन १९९१ मध्ये 'सावन कुमार' दिग्दर्शीत सलमान खान आणि चांदनीचा चित्रपट
१३) सन १९८६ मध्ये 'टि. रामाराव' दिग्दर्शीत जितेन्द्र आणि रेखाचा चित्रपट
१४) सन १९८४ मध्ये आलेल्या ऋषीकपूर आणि मोसमी चॅटर्जीचा चित्रपट
२०) सन १९७९ मध्ये 'ऋषीकेश मुखर्जी' दिग्दर्शीत अमोल पालेकर आणि बिंदीया गोस्वामीचा चित्रपट
२१) सन १९९४ मध्ये आलेला पिथून चक्रवर्ती, पूजा भट आणि अतुल अग्निहोत्री, सोनाली बेंद्रेचा चित्रपट
२३) सन १९९५ मध्ये 'राजीव मेहरा' दिग्दर्शीत शाहरुख खान, जूही चावलाचा चित्रपट
२५) सन २००० मध्ये 'सुनिल दर्शन' दिग्दर्शीत अक्षय कुमार आणि करिश्मा कपूरचा चित्रपट.
२७) सन १९८६ मध्ये 'विशु मित्रा' दिग्दर्शीत गोविंदा आणि निलमचा चित्रपट
२८) बनो (नायीका)
३०) सन १९९९ मध्ये आलेला आमीर खान आणि मनिषा कोईरालाचा चित्रपट
३१) सन १९९१ मध्ये आलेला सलमान खान आणि रेखीचा चित्रपट.

कालचे उत्तर

उ	ग्र	से	न	■	सा	र	स	बा	ग	■	ट	■
पा	ह	व	त	■	न	य	न	बा	ण	■	र	स
स	ण	क	■	क	थि	ता	■	■	वे	ल	दु	टी
ना	■	रा	ब्र	स	थि	या	ह	■	श	■	ज	प
■	द	म	■	र	■	■	■	■	■	अ	■	■
न	र	■	हा	त	घ	ला	खी	■	बा	ल	वा	डी
को	म	ट	■	खा	ल	व	र	■	जी	ग	र	■
■	हा	व	■	ना	■	ष्प	■	र	ग	■	स	त
सा	■	ट	र	■	म	■	लो	क	र	■	दा	रु
धा	रा	वी	■	सो	य	री	क	■	■	अ	र	णी
र	म	त	ग	म	त	■	गी	ता	द	त	■	■
म	■	■	■	■	वा	■	त	ल	वा	र	■	पु
■	क	ल	दा	र	■	■	■	■	ई	■	मैं	त्र

मेरी शब्द कोडे



आडवे संकेत
२. वपू
उभे संकेत
१. नवीन भारत

कालचे उत्तर:- चालका, बालनोचाल

मागील फिल्मीशब्दकोड्याचे उत्तर

अ	मि	ता	भ	ब	च्च	न	■	सै	■	म	शा	ल
भि	■	ल	■	ल	■	गी	■	नि	ल	■	न	■
बे	■	■	■	मा	■	ना	स्ती	क	■	■	दा	ग
क	या	म	त	■	■	■	■	■	■	अ	म	र
ब	■	ज	■	■	आ	ज	का	अ	र्जु	न	■	मे
च्च	■	बू	■	व्या	■	मा	■	■	न	■	रा	ज
न	ज	र	के	सा	म	ने	■	स	प	ने	■	र
■	मी	■	सी	■	■	को	■	■	डि	■	■	सा
स	र	■	बो	■	■	दी	■	■	त	र	की	ब
त्या	■	■	का	श	■	खा	मो	शी	■	■	स्म	■
■	अ	ना	डी	■	मि	ना	■	■	■	कि	त	ना
■	ग	■	या	दे	■	हैं	■	मि	■	म	■	रा
आ	र	ती	■	व	न	■	वि	रा	स	त	■	ज

जोक्स

डॉक्टरः 'तुम्ही काही दिवस आराम करायला हवा. कुठलेही बौद्धिक काम तुम्ही करता कामा नये.'

चित्रपट कथालेखकः 'मग मी चित्रपट कथा लिहिण्याचे काम थोडे दिवस बंद ठेऊ काय? '

डॉक्टरः 'छे. छे. ते काम तुम्ही चालूच ठेवा. मी बौद्धिक काम करता नये असे म्हटले आहे.'

गुंड्याने विचारले, 'बाबा! धावताना कुत्रा जीभ कशाला बाहेर काढतो?'


त्याच्यावर खेकसून वडिल म्हणाले, 'गुंड्या! अरे एवढी साधी गोष्ट तुला कळत नाही? मागच्या बाजूला लॉबिंगचा डेपटीशी समतोल साधण्यासाठी कुत्रा पुढच्या बाजूला जीभ बाहेर लॉबती ठेवतो.'

आडवे संकेत
२) श्रीकृष्ण
३) ज्याने वतन धारण केलेले आहे असा
५) शौर्य


उभे संकेत
१) पदर
२) .... करमचंद गांधी
४) राज

मागील आडवे उत्तर:- सुमन, मदतनीस, तरुनी
मागील उभे उत्तर:- नरम, सुलतानेनी, सर्वत्र

स्वस्तिक शब्दकोडे



शब्दकोडे



आडवे संकेत

१) किंचित चढउतार
६) बायकोचे नाव
९) न्याय करणारे
११) कोकणातील एक जात
१२) ज्याला गरज आहे
१३) विशिष्ट द्रव्यसंख्या
१४) सारखा (हिं.)
१६) रत्न
१८) नाडीवरुन परीक्षा करणे
२०) कोरे पुस्तक
२१) दबा धरुन बसणे
२२) तुणवा खंडोबा
२४) शेताबद्दल सरकारात दरवर्षी भरणारी रक्कम
२६) नवरदेवाची आई
२८) आग; विस्तव
२९) पंधरवाड्यातला तेरावा दिवस
३१) क्वचित
३५) एक टायर कंपनी
३६) सम्राट; बादशहा राज
३८) एक संख्या
३९) लहान खड्डा
४१) वीस दस्ते ताव
४२) आशा वाटण्यासारखी स्थिती
४४) काळोख
४६) चिता
४८) मिल
४९) एका जातीचे नांव (सासे धरण्यात पटाईत)
५०) यैतो घरा तोची दिवाळी दसरा
५१) तक्रार, दुःख

उभे संकेत

१) अस्वास्थ; दोष; विकृती
२) चंद्र
३) सर्वांचे मत
४) न वापरलेली
५) डोंगरावरुन ढकलून देणे
६) शृंगार
७) सोबती; सखा
८) रमलेला
१०) सूत कातण्याचे यंत्र
१४) नदी
१५) शहरात आढळणारे एक तिन चाकी वाहन
१७) नऊ रात्र
१८) खेतीमशागतीचे एक साधन
१९) प्रसाद देणे; ज्ञानेश्वराने लिहिलेले
२१) बाबाची मेहुणी
२३) स्तुतिपाठक
२४) आजुबाजुला राहणारे
२५) बुड, खालचा भाग
२७) पाटीचा नगण्य
३०) श्रेष्ठ योगी (स्त्री)
३२) लोखंडी पोषाख
३३) चंचल; चंट
३४) सारखे पाठांतर
३७) रमलेला; गुंग
३८) जिचा पती जीवंत आहे ती
४०) गरगोटी
४३) दुर्ग; किल्ला
४४) तरंगणे
४५) भाजी आवळा
४७) एक राजे शाहीवाहन
४८) जलद्वार; पिंड; त्रास

मागील शब्दकोड्याचे उत्तर

नि	बं	ध	■	■	ख	मा	जि	क	■	■	घ	ण
म	द	न	■	सं	ज	य	त	■	म	स	■	ज्ञ
गो	र	ग	री	ब	■	■	ध	न	य	घ	न	■
रा	■	र	ब	र	■	क	त	■	स	न	द	■
■	स	■	ण	■	सा	ल	■	रं	भा	■	र	वी
आ	भा	स	■	■	■	क	र	क	■	ध	■	स
प	स	र	■	ढ	ग	■	स	■	शं	ति	र	स
म	द	ना	य	क	■	■	■	श	त	क	■	न
त	■	मा	म	ल	त	■	उ	प	य	र	■	■
न	ढ	■	■	चं	■	■	ध	त	न	■	मा	स
वी	ख	■	प	द	वी	■	ख	■	■	ग	ज	रा
■	■	स	ख	■	न	ग	र	भ	वा	नी	■	ग
स	म	त	ल	■	य	म	■	ट	क	म	क	■

ज्ञानेश कुमारांबाबत केंद्राने तातडीने निर्णय घ्यावा, शरद पवारांची भूमिका; उजनीतील AI डेटा सेंटरवरही परखड बोलले

मी दुष्काळाची प्रत्यक्ष माहिती घेत आहे, १ नोव्हेंबर रोजी माढा तालुक्यातील दुधाळी भागात जाणार आहे. माझ्याबरोबर तिथले आमदार आहेत, ते मला तिथली माहिती देतील.

दै. लोकजन वृत्तसेवा

पुणे:– राज्यात यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचं सावट असून दुष्काळी दौऱ्याच्या निमित्ताने सरकारकडून शेतकऱ्यांना ५००० रुपयांची अग्रीम मदतही करण्यात आली. त्याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी दुष्काळी दौरा सुरू केला असून आज आणि आज ते सोलापूर जिल्ह्यात असणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी संवाद सादताना शरद पवारांनी दिल्लीतील इंडिया आघाडीचं आंदोलन, दुष्काळ परिस्थिती, सरकारची भूमिका, उजनीतील एआय डेटा सेंटरसंदर्भातील विविध प्रश्नांना उत्तरे दिली.

मी दुष्काळाची प्रत्यक्ष माहिती घेत आहे, १ नोव्हेंबर रोजी माढा तालुक्यातील दुधाळी भागात जाणार आहे. माझ्याबरोबर तिथले आमदार आहेत, ते मला तिथली माहिती देतील. मात्र, शेतकऱ्यांना पाणी, चारा याची अत्यंत गरज आहे. उदाहरण द्यायचं झालं तर सोलापूरमध्ये १३९ गावे आहेत, १३५ टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. माढा तालुक्यात ११० टँकर आहेत, हे एका जिल्ह्याचं आहे, असे म्हणत शरद पवारांनी दुष्काळी परिस्थितीचं गांभीर्य सांगितलं. लोकांना मी प्रत्यक्ष भेटणार असून त्यांना लागणाऱ्या गरजा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहील. मला खात्री आहे, मी राज्य सरकारला विनंती करेल, सरकारची मदत मिळेल. माझी दिल्लीत आणि मुख्यमंत्र्यांशी बैठक झाली आहे, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काहीतरी मार्ग काढला जाईल अशी खात्री आहे, असेही पवारांनी म्हटले.



ज्ञानेश कुमारांबाबत केंद्राने निर्णय घ्यावा

सध्या राजधानी दिल्लीत इंडिया आघाडीचं आंदोलन सुरू असून निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. त्यामुळे, केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यायची आवश्यकता आहे. निर्णय घेतला नाही, त्यामुळे १ नोव्हेंबर रोजी दिल्लीत विरोधी पक्ष एकत्र येणार आहेत, असे शरद पवारांनी म्हटले. तसेच, सुप्रिया सुळे आणि संजय राऊत आंदोलनातून लढणार आहेत. माझं लक्ष पाणी-चारा आणि दुष्काळावर असल्याचंही शरद पवार यांनी स्पष्ट केलं.

पाणी जपून वापरलं पाहिजे

पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असून पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. पुण्यातील खडकवासला आणि इतर धरणातील पाणी काळजीपूर्वक वापरले पाहिजे. आजपासून ते जवळपास जूनपर्यंतची काळजी घ्यावी लागणार आहे. पाण्याचा साठा यावर लक्ष दिल पाहिजे, अशी भूमिका देखील शरद पवारांनी मांडली.

उजनी एआय डेटा सेंटरवर मांडली भूमिका

आमदार रोहित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या आमदारांनी उजनी येथील ए.आय. प्रकल्पाला विरोध केला आहे. त्यासंदर्भातही शरद पवारांनी आपली प्रतिक्रिया दिली. ए.आय. आलं म्हणजे पाणी गेलं असं नव्हे, पाणी जपून वापरलं पाहिजे एवढेच. मी तिथं जाईन, लोकं काय म्हणतात याची माहिती घेईल, काही दुरुस्ती करायची आवश्यकता असेल तर त्या करू... असे म्हणत शरद पवारांनी उजनीतील एआय डेटा सेंटर आणि पाण्याच्या प्रश्नावर परखडपणे मत मांडले.

यंदा दिवाळी करणार नाही – शरद पवार

दरम्यान, यंदा आमच्याकडे दिवाळी नाही, यावेळी आम्ही दिवाळी करणार नाही, असेही त्यांनी सांगितले. दिवंगत नेते अजित पवार यांचे निधन जानेवारी महिन्यात झाले, त्यामुळे पवार कुटुंबाकडून यंदा कुठलाही सण साजरा केला जाणार नाही. तर, यंदा पहिल्यांदाच अजित पवारांविना दिवाळीचा सण येतोय. त्यामुळे, कुटुंबीयांना मोठं दुःख असल्याने यंदा पवार कुटुंबीय दिवाळी साजरी करणार नाही.

राम पूर्णेकर आणि देवेंद्र फडणवीसांची दुसऱ्यांदा भेट; भेटीनंतर प्रदीप पूर्णेकरांच्या मुलाचा खळबळजनक दावा

राम पुर्णेकर यांनी १ नोव्हेंबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ठाण्यात भेट घेतली.

दै. लोकजन वृत्तसेवा

मुंबई:– ठाण्यातील ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते प्रदीप पुर्णेकर हत्या प्रकरणात त्यांचा मुलगा राम पुर्णेकर यांनी १ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ठाण्यात भेट घेतली. या भेटीदरम्यान, राम पूर्णेकर आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात बंद दाराआडमध्ये चर्चा झाली. यावेळी प्रदीप पूर्णेकर यांच्या मारेकऱ्यांना सरकार पाठीशी घालणार नाही, असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी राम पूर्णेकर यांना दिलं.



देवेंद्र फडणवीसांच्या भेटीनंतर राम पूर्णेकर काय म्हणाले?

मुख्यमंत्र्यांची भेट घेतलेली आहे. ज्या पद्धतीने माझे बाबा प्रदीप पूर्णेकर यांची निर्घृण हत्या झाली. त्यावर देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली. १ नोव्हेंबर रोजीचं बोलणं खूप शांत-चित्ताने झालं, बंद दरवाजाआड चर्चा वगैरे असं काही नव्हतं. ठाण्यामध्ये जे चाललंय ते सर्व समजावून सांगितलं, जे पुरावे होते ते सर्व मी देवेंद्र फडणीसांना दाखवले, अशी माहिती राम पूर्णकर यांनी दिली. गेले महिनाभर उलटून देखील ५ आरोपी अटक आहेत. जे होतं ते थेट देवेंद्र फडणवीसांसोबत बोललो. २९ सप्टेंबरपासून आत्तापर्यंत मी त्यांच्याकडूनच अपेक्षा ठेवली आहे. मला अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आहे. ठाण्यात काय चाललंय ते मुख्यमंत्री ना समजावलं, पुरावे दिले, बंद दाराआड चर्चा नाही, शांततेत बोलणं झालं, न्यायाची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच आहे, अशी माहिती राम पूर्णेकर यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी पूर्णेकर यांना न्याय देणार असे आश्वासन दिल्याची माहिती राम पूर्णेकर यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटू देऊ नये, यासाठी अनेक फोन आले असा दावाही राम पुर्णेकर यांनी केला आहे.

नेमकं प्रकरण काय?

ठाण्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप (बाळा) पूर्णेकर यांच्यावर २९ सप्टेंबर रोजी रात्री साधारण साडेनऊच्या सुमारास पाच हल्लेखोरांनी शिरुन पिस्तुलमधून सात राऊंड फायर केले. त्यापैकी चार गोळ्या प्रदीप पूर्णेकर यांच्या शरीरात घुसल्या. पूर्णेकर यांचे कार्यकर्ते कार्यालयात पोहोचले तेव्हा ते रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांचा तातडीने नजीकच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. प्रदीप पूर्णेकर यांच्या कुटुंबीयांनी ठाण्याच्या माजी महापौर मिनाक्षी शिंदे आणि त्यांच्या पतीवर हत्येचा कट रचल्याचा आरोप केला आहे.

खेळताना अचानक लिफ्टचा दरवाजा उघडला अन्.., मुंबईतील ११ वर्षीय झैनच्या मृत्यूप्रकरणी तीन महिन्यानंतर कारवाई

लिफ्टच्या देखभाल तसेच दुरुस्तीमधील त्रुटी तसेच देखभाल आणि दुरुस्तीसाठी अधिकृत परवानाधारक ठेकेदाराची नेमणूक न केल्याने पोलिसांनी कारवाई केली आहे.

दै. लोकजन वृत्तसेवा

मुंबई:– मुंबईतील कुर्ला पूर्व येथील एका रहिवासी इमारतीत लिफ्टच्या केबिनच्या छतावर पडून ११ वर्षीय मुलाच्या झालेल्या मृत्यूच्या प्रकरणात एक मोठी घडामोड समोर आली आहे. या दुर्घटनेस जबाबदार असलेल्या हलगर्जीपणाबद्दल मुंबई पोलिसांनी 'शमीम टॉवर कुर्ला कदम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी' च्या तीन पदाधिकाऱ्यांविरोधात FIR नोंदवली आहे. तौफिक अस्फाक खान (वय ५२, सोसायटीचे अध्यक्ष), आसिफ मन्सूर खान (वय ५०, सचिव) आणि मोला युसेन पटेल (वय ६०, खजिनदार) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे आहेत. गेल्या ६ जुलै रोजी झालेल्या या लिफ्टच्या अपघातात झैन तहसीदार या ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या तीन महिन्यांच्या तपासानंतर नेहरू नगर पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या तिन्ही पदाधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), १२५, २८९ आणि ३(५) नुसार कारवाई केली आहे.

कशी घडली दुर्घटना?

एफआयआरनुसार, ६ जुलै रोजी रात्री साडे नऊच्या सुमारास कुर्ला पूर्व येथील जागृती नगरमधील शमीम टॉवरच्या बिल्डिंग नंबर २ मधील बी विंगच्या १० व्या मजल्याच्या पॅसेजमध्ये झैन इतर मुलांसोबत खेळत होता. खेळत असताना अचानक १० व्या मजल्यावरील लिफ्टचा दरवाजा उघडला. त्यामुळे तोल गेल्याने झैन थेट लिफ्टच्या शाफ्टमध्ये (खड्ड्यात) पडला आणि तिसऱ्या मजल्यावर थांबलेल्या लिफ्टच्या केबिनच्या छतावर जाऊन आदळला. या पडझडीत त्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेच्या वेळी झैनचे वडील जमीर शौकत तहसीदार (वय ३२, रेडीमेड गारमेंट्सचा व्यवसाय) कामानिमित्त चेंबूर येथे गेले होते. त्यांना पत्नी फजिला (वय २७) हिने फोन करून अपघाताची माहिती दिली. सोसायटीत पाणी पुरवठा करणारे इरफान खान यांच्या मदतीने कुटुंबीय आणि रहिवाशांनी तिसऱ्या मजल्यावरील लिफ्टच्या भागातून जखमी मुलाला बाहेर काढले. झैनला उपचारासाठी तातडीने सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी रात्री सुमारे १०:४० वाजता त्याला मृत घोषित केले.

विद्युत निरीक्षकांनी लिफ्टला ठरवले तांत्रिकदृष्ट्या अनफिट

घटनेनंतर नेहरू नगर पोलिसांनी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. दरम्यान, कुर्ला पश्चिम येथील विद्युत निरीक्षकांनी सादर केलेल्या तपासणी अहवालामुळे या प्रकरणात मोठे सत्य बाहेर आले. अहवालानुसार, महाराष्ट्र लिफ्ट कायद्यांतर्गत वैध परवाना असलेल्या अधिकृत लिफ्ट कंत्राटदाराकडून लिफ्ट क्रमांक ०२ ची देखभाल आणि दुरुस्ती करणे बंधनकारक होते. मात्र, सोसायटीने लिफ्टच्या देखभालीसाठी कोणत्याही अधिकृत व परवानाधारक कंत्राटदाराची नियुक्ती केली नव्हती. लिफ्टच्या दुरुस्ती आणि देखभालीतील त्रुटींमुळेच हा अपघात घडल्याचे आणि लिफ्ट तांत्रिकदृष्ट्या वापरण्यास अयोग्य असल्याचे या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

टोरेंट प्रकल्पासाठी वृक्षतोड नकोच, कर्जतमधील भाजपा नेत्याने पर्याय सूचवला; व्हिडिओ दाखवत सरकारकडे मागणी

मनसेप्रमुख राज ठाकरे, आमदार आदित्य ठाकरेंनी प्रत्यक्ष वृक्षतोड झालेल्या ठिकाणी भेट देऊन आपला विरोध दर्शवला. तसेच, येथील महायुतीमधील राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनीही वृक्षतोडीला विरोध केला आहे.

दै. लोकजन वृत्तसेवा

रायगड:– भीमाशंकर आणि कर्जतच्या साय डोंगररांगात होत असलेल्या टोरेंट ग्रीन एनर्जी प्रकल्पासाठी ३३ हजार झाडं तोडण्यात येणार आहेत. त्यातील, हजारो झाडे तोडण्यातही आली असून स्थानिकांनी या वृक्षतोडीला विरोध केला. त्यानंतर, प्रमुख विरोधी पक्षातील नेत्यांनीही या वृक्षतोडीला विरोध दर्शवत हा प्रकल्प होऊ न देण्याची भूमिका घेतली आहे. आता, स्थानिक भाजपनेही या वृक्षतोडीऐवजी वृक्षांचे पुनर्रोपण करण्याची मागणी केलीय. विकासाला आमचा विरोध नाही, पण या वृक्षतोडीऐवजी वृक्षांचे पुनर्रोपण करण्याची मागणी सरकारकडे करणार असल्याचं रायगडमधील भाजपने म्हटलं आहे. चायनाच्या धर्तीवर वृक्षांचे प्रत्यारोपण करण्याची पद्धत सरकारने अवलंबावी, असे भाजपचे कर्जत विधानसभा प्रमुख किरण ठाकरे यांनी म्हटलं.

मनसेप्रमुख राज ठाकरे, आमदार आदित्य ठाकरेंनी प्रत्यक्ष वृक्षतोड झालेल्या ठिकाणी भेट देऊन आपला विरोध दर्शवला. तसेच, येथील महायुतीमधील राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनीही भूमिका घेत वृक्षतोडीला विरोध दर्शवला होता. आता, कर्जतमधील भाजप नेत्यांनीही याबाबत भूमिका मांडली आहे. रायगडच्या कर्जत तालुक्यात प्रस्तावित टोरंट कंपनीच्या साई डोंगर जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पातून तीन हजार मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. हा ग्रीन एनर्जी प्रकल्प असला तरी त्यासाठी होणारी मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड ही चिंतेची बाब आहे. मात्र, येथील प्रकल्पातून तयार होणाऱ्या विकासाला आमचा विरोध नसून पर्यावरणाचे नुकसान टाळून विकास साधने गरजेचे आहे, अशी भूमिका १ नोव्हेंबर रोजी कर्जतमधील भाजप नेत्यांनी मांडली आहे. भाजपचे कर्जत विधानसभा प्रमुख किरण ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत पक्षाची स्थानिक भूमिका स्पष्ट केलीय.

अमेरिका, जपान आणि चीन यांसारख्या देशांमध्ये झाडे तोडण्याऐवजी ती मुळासकट काढून दुसऱ्या ठिकाणी पुनर्रोपित करण्याचे प्रयोग केले जातात. त्यानंतर चार वर्षे पाणी, आवश्यक औषधोपचार आणि तज्ज्ञांच्या मदतीने या झाडांचे संगोपन केले जाते. अशाच पद्धतीचा अवलंब कर्जतमध्येही करण्यात यावा अशी मागणी यावेळी किरण ठाकरे यांनी केली.



राष्ट्रवादीच्या सुधाकर घारेंचा विरोध

कर्जत-भीमाशंकर येथील साय डोंगरात सुरू असलेल्या वृक्षतोडीवरुन सध्या राजकीय वातावरण तापलं आहे. येथील वृक्षतोडीला विरोध करत स्थानिकांनी टोरेंट प्रकल्पासाठी सरकारने घेतलेल्या निर्णयालाही थेट विरोध दर्शवला आहे. दरम्यान, या प्रकल्पाच्या मुद्यावरुन स्थानिक सत्ताधाऱ्यांमध्ये वाद असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. टोरंट प्रकल्पाला शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवेंचा पाठिंबा आहे तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते सुधाकर घारे यांचा विरोध आहे. स्थानिक मेले तरी चालतील मात्र स्थानिकांना मारणारे प्रकल्प येऊद्या अशी थोरवेंची भूमिका असल्याची टीका सुधाकर घारेंनी केली होती. आता, भाजप नेत्यांनीही भूमिका स्पष्ट केली आहे.

सडक अर्जुनी येथे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेची राज्य नोडल अधिकाऱ्यांकडून पाहणी; विद्यार्थ्यांशी साधला संवाद ग्रामीण रुग्णालय सडक अर्जुनी येथे सुद्धा आकस्मिक भेट

दै. लोकजन वृत्तसेवा

सडक अर्जुनी:– राष्ट्रीय जंतनाशक मोहीम च्या अनुषंगाने २७ ऑक्टोबर रोजी राज्य नोडल अधिकारी तथा नागपूर येथील प्रादेशिक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. श्रीराम गोगुलवार यांनी सडक अर्जुनी येथील विविध केंद्रांना अचानक भेटी देऊन सुरू असलेल्या कामाची सविस्तर पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान डॉ. श्रीराम गोगुलवार यांनी सडक अर्जुनी येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक ३ तसेच जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक कनिष्ठ विद्यालय, सडक अर्जुनी येथे प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी जंतनाशक गोळ्यांच्या (अल्बेंडाझॉल) वाटपाची आणि मोहिमेच्या पूर्वतयारीची पाहणी केली. अभियान यशस्वीरीत्या राबवण्यासाठी त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या.

भेटीदरम्यान डॉ. गोगुलवार यांनी शाळेतील व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी लहान मुलांना जंत संसर्गाचे धोके, आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता आणि जंतनाशक गोळी सेवनाचे महत्त्व अतिशय सोप्या भाषेत पटवून दिले. या महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्यात सडक अर्जुनीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रणित पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी तालुक्यातील मोहिमेच्या नियोजनाची माहिती दिली. या प्रसंगी दोन्ही शाळा व अंगणवाडीमधील मुख्यध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सडक अर्जुनी ग्रामीण रुग्णालयाला भेट; आरोग्य सुविधांची पाहणी व आढावा

सडक अर्जुनी तालुक्यातील आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी राज्य नोडल अधिकारी डॉ. श्रीराम गोगुलवार यांनी सडक अर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालयाला सुद्धा आकस्मिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून आरोग्य यंत्रणेचा सविस्तर आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले. भेटी दरम्यान रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषध साठा आणि आपत्कालीन सेवांची बारकाईने तपासणी केली. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी औषधांची उपलब्धता आणि रुग्णालयीन स्वच्छतेबाबत त्यांनी कडक सूचना दिल्या. रुग्णालयात राबविण्यात येणाऱ्या विशेष वैद्यकीय मोहिमा (उदा. हायड्रोसिल शस्त्रक्रिया शिबीर, फिजिओथेरपी कॅम्प) आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मिळणाऱ्या सुविधांच्या गतीबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.

या भेटीदरम्यान ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रणित पाटील तसेच स्थानिक डॉक्टर आणि इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. नोडल अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना ग्रामीण व आदिवासी भागातील रुग्णांना तत्पर आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा देण्याचे आवाहन केले.



कुर्हाडी येथे दोन दिवसीय 'सीपीएचसी' आरोग्य प्रशिक्षण संपन्न; प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात वृक्षारोपणाचा नावीन्यपूर्ण उपक्रम

दै. लोकजन वृत्तसेवा

गोरेगाव:– गोरेगाव तालुक्यातील कुर्हाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात २८ व २९ ऑक्टोबर रोजी दोन दिवसीय सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा, सीपीएचसी प्रशिक्षण वर्ग यशस्वीरीत्या संपन्न झाले. या प्रशिक्षणादरम्यान आरोग्य सेवेसोबतच पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला.

जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी तथा जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. राजेश बेळमकर यांच्या संकल्पनेतून, ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये हे सीपीएचसी प्रशिक्षण आयोजित केले जात आहे. त्या सर्व ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याच संकल्पनेचा भाग म्हणून कुर्हाडी प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात विविध उपयुक्त वृक्षांची लागवड करण्यात आली.

आरोग्य आणि पर्यावरणाची सांगड: प्रशिक्षणादरम्यान उपस्थित आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींच्या हस्ते आरोग्य केंद्र परिसरात उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. 'उत्तम आरोग्यासाठी शुद्ध हवा आणि स्वच्छ पर्यावरण अत्यंत आवश्यक आहे. वृक्षारोपण केल्याने आरोग्य केंद्राचा परिसर सुशोभित तर होईलच, सोबतीने रुग्णांना व कर्मचाऱ्यांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मदत होईल,' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांना प्राथमिक आरोग्य सेवा अधिक बळकट करणे, विविध आजारांचे वेळेत निदान आणि उपचार यांबाबतचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आणि आरोग्य विभागाच्या या पर्यावरणपूरक पाऊलाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार व सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे यांनी संपूर्ण प्रशिक्षण चमुचे अभिनंदन केले आहे तसेच आरोग्य विभागात कौतुक होत आहे.



या प्रशिक्षण सत्रादरम्यान बाई गंगाबाई जिल्हा स्त्री रुग्णालयाचे बालरोगतज्ज्ञ डॉ. सचिन उइके यांच्यासह डॉ. अमित खोडणकर, डॉ. अमिता नरडेले, डॉ. सुजाता ताराम, माधुरी टेंभुर्णीकर, मंजुषा बहेकार, अर्चना मेंढे आणि झामेश गायकवाड यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना विविध तांत्रिक व आरोग्यविषयक घटकांवर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या दोन दिवसीय प्रशिक्षणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे डॉ. राजेश बेळमकर यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेला वृक्षारोपणाचा नावीन्यपूर्ण उपक्रम. प्रशिक्षण संपल्यानंतर केवळ कागदोपत्री काम न करता प्रत्यक्ष कृतीवर भर देत सर्व मार्गदर्शक अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण केले.

या पर्यावरणपूरक उपक्रमात डॉ. बेळमकर, डॉ. उइके, डॉ. खोडणकर यांच्यासह सर्व उपस्थित वैद्यकीय चमूने स्वतः झाडे लावून त्यांच्या संगोपनाचा संकल्प केला. आरोग्याची काळजी घेतानाच परिसरातील निसर्गाचे रक्षण करणेही तितकेच गरजेचे आहे, हा संदेश या माध्यमातून समाजाला देण्यात आला. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

प्रशिक्षणात आरोग्य संस्थेतील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, आशा सेविका व आशा गट प्रवर्तक यांना आरोग्य विषयक तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामीण स्तरावर आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी आणि दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यासाठी फील्ड लेव्हलवर या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणामुळे गाव पातळीवरील आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यास मदत होणार असल्याची माहीती जिल्हा शल्यचिकित्सक क अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. तृप्ती कटरे यांनी दिली आहे.

शिबिराची मुख्य वैशिष्ट्ये:

* ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविणे., * आधुनिक उपचार पद्धती व आरोग्यविषयक माहिती देणे., * प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करणे., * रुग्णांना वेळेत व दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे.

देशात समाजवादी व्यवस्था कायम करणे हे आयटकचे उद्दिष्ट

वर्धापन दिनी कॉम्रेड हिवराज उके यांचे प्रतिपादन

दै. लोकजन वृत्तसेवा

भंडारा :– शासनावर कब्जा करणे हे श्रमिकांचे उद्दिष्ट असावे तर देशात समाजवादी व्यवस्था काम करणे हे आयटक चे उद्दिष्ट होते आणि आहे असे प्रतिपादन आयटकच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा सचिव कॉम्रेड हिवराज उके यांनी केले.



दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ ला दुपारी १ वाजता आयटक चे जिल्हा कार्यालय राणा भवन भंडारा येथे आयटकचा १०६ वा वर्धापन दिन कॉम्रेड दिलीप ढगे यांच्या अध्यक्षतेखाली व आयटक चे जिल्हा सचिव कॉम्रेड हिवराज उके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच कॉम्रेड वामनराव चांदेवार व श्रीराम भिवगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सर्वप्रथम जागतिक कीर्तीचे क्रांतिकारी तत्त्वज्ञ कॉम्रेड कार्ल मार्क्स व भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. आणि दुनिया के मजदूर एक हो, समाजवाद जिंदाबाद, कामगार कर्मचारी किसान एकता जिंदाबाद, चार लेबर कोड रद्द करा, जनविरोधी सरकार नही चलेगी, भारतीय संविधान जिंदाबाद, इन्कलाब जिंदाबाद इत्यादी घोषणा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे संचालन बांधकाम कामगार व भाकपचे भंडारा तालुका सचिव कॉम्रेड गजानन पाचे यांनी केले. तर आभार कॉम्रेड भगवान मेश्राम यांनी मानले. याप्रसंगी पुढे बोलताना कॉम्रेड हिवराज उके म्हणाले की, देशात व राज्यात कामगार विरोधी सरकार असून आयटक या देशव्यापी पहिल्या मध्यवर्ती कामगार संघटने ने मागील शंभर वर्षात लढून व संघर्ष करून २९ कामगार कायदे मंजूर करून घेतले. नंतर त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संवैधानिक संरक्षण ही दिले, ते रद्द करून त्याऐवजी मालक धार्जीने कामगार विरोधी चार लेबर कोड या सरकारने आणले. ते रद्द होत पर्यंत कामगार वर्गाने स्वस्थ बसू नये. तसेच श्रमिकांच्या जवळ हरण्यासाठी त्यांच्या हातांच्या बेड्याशिवाय काहीच नाही तर जिंकण्यासाठी संपूर्ण जग आहे हे कार्ल मार्क्सच्या विचाराचे पुनरोच्चार कॉम्रेड हिवराज उके यांनी केले. तर आपल्या अध्यक्षीय भाषणात कॉम्रेड दिलीप ढगे यांनी कामगार कष्टकरी शेतकरी वर्गाने जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन एकजूट करून कामगार वर्गाच्या न्याय हक्कासाठी संघर्ष तीव्र करावे व शासनाचे जन विरोधी धोरण हाणून पाडावे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाला विविध कामगार कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते त्यात प्रामुख्याने कॉम्रेड दीपक गजभिये, गणेश क्षीरसागर, सेवानिवृत्त पोलीस पाटील प्रीतम चव्हाण, अरुण मेश्राम, यलीचंद मडामे, अंशकालीन कामगार स्मिंकल, लोणारे, दमन गणवीर, वसंता बोरकर, मदन मते, वासुदेव आकरे, मधुकर बांते, शिवशंकर वंजारी, भागवत नडंगे, पुणाजी गायधने इत्यादींची उपस्थिती होती.

स्कायवर्ड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये बाल संरक्षण व पोक्सो जागरूकता कार्यक्रम



दै. लोकजन वृत्तसेवा

लाखनी :– विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी या उद्देशाने २९ ऑक्टोबर रोजी स्कायवर्ड्स इंटरनॅशनल स्कूल, लाखनी येथे बाल संरक्षण आणि पोक्सो जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाखनी दिवाणी न्यायालयाचे सिव्हिल जज (वरिष्ठ स्तर) तथा प्रेसिडेंट उदय हिंगमिरे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. जितेंद्र धोटे व ॲड. डोये उपस्थित होते.

यावेळी न्यायाधीश उदय हिंगमिरे यांनी पोक्सो कायद्याची पार्श्वभूमी व महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले. प्रत्येक मुलाला सुरक्षित वातावरणात जगण्याचा व शिक्षणाचा अधिकार आहे, कोणताही गैरप्रकार जाणवल्यास न घाबरता आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले. ॲड. जितेंद्र धोटे व ॲड. डोये यांनी विद्यार्थ्यांना गुड टच व बॅड टच मधील फरक ओळखण्याबाबत मार्गदर्शन केले. संकटाच्या वेळी पालक, शिक्षक किंवा पोलिसांशी त्वरित संपर्क साधण्याचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संचालक डॉ. पंकज कटकवार, अल्का कटकवार, डॉ. नीरज कटकवार, लीना कटकवार, विटीसी क्लासेसचे संचालक डॉ. विलास बुलकुंडे व डॉ. सोनाली काकडे यांनी सहकार्य केले.

नाशिकराव विद्यालय चा अर्णव गजभिये ५४ व्या विज्ञान प्रदर्शनीत तालुक्यात प्रथम

दै. लोकजन वृत्तसेवा

किन्ही (मोखे) :– नाशिकराव विद्यालय सातलवाडा चे विद्यार्थी अर्णव अनिल गजभिये इयत्ता सहावी व हर्षल अरुण भोंडे इयत्ता आठवी ह्या विद्यार्थ्यांनी सानगडी येथे पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय ५४ व्या विज्ञान प्रदर्शनीत सहभाग नोंदविलेला होता. त्यात अर्णव अनिल गजभिये याचा त्याच्या स्मार्ट फ्रीज ह्या प्रयोगाला तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळाला. त्यामुळे नाशिकराव विद्यालयात व गावात अभिनंदन करण्यात आले.



अर्णव गजभिये याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. त्यात शाळेचे संस्था सचिव प्रकाश बडोले शाळेचे मुख्याध्यापक एस. टी. साखरे सहाय्यक शिक्षिका एस. जी. बिसेन, एच. टेंभरे, एस. पी. बडोले, एस. एम. मेश्राम, टी. एस. बडोले, आरती भोयर, निर्मला कामगते, दागो वलथरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुजित मेश्राम, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा संगीता उपाध्याय शाळा व्यवस्थापन शिक्षण तज्ञ एकनाथ रहांगडाले, मोनाली गणवीर, शाळा व्यवस्थापन सदस्य रेखा भोंडे, माता पालक समिती च्या पदाधिकारी मालता रहांगडाले, ज्योती वाघाडे, ममता पारधी, बबीता शेंडे, छाया कन्नाके, डीलेश्वरी भोंडे, किशोर कावळे, राजकुमार वाघाडे, मनोहर सोनवणे, भूमिंद्र बिसेन, प्रफुल्ल टेंभुर्णी, राजेश राऊत, अर्णव चे आई-वडील अनिल गजभिये व गीता गजभिये, गावातील सरपंचा अंजना पुरुषोत्तम मेश्राम व प्रतिष्ठित व्यक्ती पोलीस पाटील रमेश भोंडे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विलास भोंडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच ग्राम सातलवाडा, माहुली, रेंगेपार, गिरोला, किन्ही, मालूटोला, भीवसनटोला या गावातील पालकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याला सर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा समोरच्या वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या आहेत.

मिस्कीन टँक गार्डनमध्ये गांजाचे सेवन; एकावर गुन्हा

भंडारा :– शहरातील मिस्कीन टँक गार्डन येथे सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करणाऱ्या एकाविरुद्ध भंडारा पोलिसांनी गुन्हा नोंदविला. ही घटना २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. स्थानिक गुन्हे शाखेचे एनडीपीएस पथक गस्तीवर असताना संबंधित व्यक्ती चिनी मातीच्या चिलममध्ये गांजा भरून सेवन करताना आढळली. पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करून अर्धवट जळालेल्या गांजाची चिलम, सुती कापडाचा तुकडा आणि आगपेटी असा एकूण २१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून रक्ताचे नमुनेही घेण्यात आले. पोलिस हवालदार कृष्णकुमार बोरकर यांच्या तक्रारीवरून भंडारा पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

परमात्मा एक सेवक सानगडीची कोजागिरी उत्साहात साजरी

दै. लोकजन वृत्तसेवा

सानगडी :– परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ वर्धमान नगर नागपूर द्वारा परमपूज्य परमात्मा एक सेवक सानगडीची कोजागिरी टिकाराम भेंडारकर, माजी संचालक प. पु. परमात्मा एक सेवक मंडळ वर्धमान नगर नागपूर तथा मार्गदर्शक सानगडी यांच्या निवासस्थानी नुकतीच संपन्न झाली. यावेळी एका भगवंताची चर्चा बैठक घेण्यात आली



चर्चा बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवशंकर बारसागडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक मेश्राम, अनिल नान्हे, खोमेश्वर खंडाईत, नरेंद्र तुळशीकर, तुलाराम नान्हे, हरगोविंद नेवारे, रवी सळमते, वंदना भेंडारकर, अमरकांता देवरे, चंदा तवाडे, भागरथा चंडीमेश्राम, सरिता नान्हे, सलिता मेश्राम, अंजना बारसागडे इत्यादी मान्यवर सेवकांच्या उपस्थितीत चर्चा बैठक पार पडली.

सेवकात बंधुभाव वृद्धीगत व्हावा. सामाजिक एकात्मतेची भावना अधिक दृढ व्हावी. परस्परात सुसंवाद व विचारांची देवाण घेवाण व्हावी आणि सेवकांच्या विकासाला नवी दिशा मिळावी या उदात्त हेतूने सामूहिक कोजागिरी आनंद उत्सवाचें आयोजन करण्यात आले. केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता सेवकांना एकत्र आणणारा, सामूहिक हितगुज साधणारा आणि सामूहिक विकासाची प्रेरणा देणारा हा आनंदोत्सव खऱ्या अर्थाने सेवकांच्या एकात्मिकतेच्या प्रतीक ठरला.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शनात शिवशंकर बारसागडे म्हणाले की आपण कोजागिरी का साजरी करतो? तर बाबा जुमदेवजींनी बाजीराव माटे यांना एक म्हैस विकत घेऊन दिली आणि बाजीराव माटेची ती म्हैस विकत घेण्याची इच्छा नसतानाही बाबाच्या आदेशानुसार त्यांना विकत घ्यावी लागली आणि त्याच म्हशीने इच्छानुसार दूध दिला. असे अनेक उदाहरणं देऊन बारसागडे यांनी सेवकांना जागवण्याचा प्रयत्न केला.

चर्चा बैठकीचे प्रास्ताविक सुधीर मांडवटकर यांनी केले, सायंकाळची प्रार्थना राजू नान्हे यांनी केली, संचालन गणेश झिंगरे तर आभार रोहित जगणे यांनी मानले. यावेळी सानगडी, सानगाव, डोंगरगाव येथील सेवक उपस्थित होते.स्नेह भोजनाचा आस्वाद व प्रसादाचे वाटप करून कोजागिरीची सांगता करण्यात आली.

वादळी पावसाचा तडाखा; कुणाचे नुकसान, कुणाला फायदा

भंडारा :– जिल्ह्यात लाखांदूर तालुक्यात गुरुवार दि. २८ व २९ ऑक्टोबर २०२६ ला अक्षरशा पावसाने झोडपून काढले. त्यामुळे कापणीला आलेले थानाचे पीक भूईसपाट झाले. त्यात सर्वाधिक नुकसान धानपिकाला झाल्याचे वृत्त आहे. तर शुक्रवार दि. ३० ऑक्टोबरला तुमसर तालुक्यातील गोबरवाही परिसरात जोरदार पाऊस झाल्याने कापणी केलेल्या हलक्या वाणाच्या धानाचे प्रचंड नुकसान झाले. मात्र भारी वाणाच्या धानाला एका पाण्याची आवश्यकता असल्याने आलेला वादळी पाऊस त्यासाठी फायद्याचा ठरला. तसेच भाजीपाला पिकालाही फायद्याचा ठरला असल्याचे सांगितले जाते. दरवर्षी दिवाळी सणाअगोदर वादळी वाऱ्यासह पाऊस कुठे ना कुठे कोसळत असतो. यावर्षी पावसाच्या अखेरच्या नक्षत्रात पाऊस कोसळला.

स्वाती या नक्षत्राला २४ ऑक्टोबरपासून प्रारंभ झाला या नक्षत्राचे वाहन बेडूक असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे पावसाचे प्रमाण या नक्षत्रात चांगले असल्याचे ओळखले जाते. तसेच हवामान खात्याच्या अंदाजानुसारही विदर्भासह भंडारा जिल्ह्यात पाऊस कोसळणार असा अंदाज व्यक्त करण्यात आला. तो तंतोतंत खरा ठरला. आता पाऊस कोसळत आहे. त्यामुळे कुणाचे नुकसान, तर कुणाला फायदा असल्याचे वृत्त आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात धानपिकासोबत तूर, मिरची, कपासी, सोयाबीन, भाजीपाला व फळवर्गीय पिकाचेही उत्पादन घेतले जाते. धानाला कमी मात्र मिरची व कपासीला पाण्याची गरज होती. अन् दिवाळी अगोदर पाऊस कोसळला. त्यामुळे या पिकाला वादळी वाऱ्यासह आलेला पाऊस फायदा ठरला असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यात खरीप हंगामातील पिके कापणीला आली. त्यात सर्वाधिक धानपिक कापणीची लगबग सुरू आहे.

ग्रामगीता हा ग्रंथ नसून जीवन आहे - डी. एल. सावरबांधे

सावरला :– ब्रह्मलीन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५८ वी पुण्यतिथी सावरला येथील हनुमान मंदिर क्रमांक एकच्या पटांगणावर बंद शामियानात साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित मान्यवर व गावकऱ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त संबोधित करताना प्राचार्य डी. एल. सावरबांधे यांनी सांगितले की, राष्ट्रसंतांनी ग्रामगीता हा ग्रंथ जनतेच्या उद्धारासाठी लिहिला. त्यामुळे ग्रामगीता हा ग्रंथ नसून जीवन आहे असे गौरवोद्गार काढले. ग्रामगीता हा ग्रंथ प्रत्येक घरात असावा आजच्या पिढीने हा ग्रंथ वाचला तर जीवन जगणे सुकर होईल. ग्रामगीतेमध्ये संपूर्ण जीवनाचे सार सांगितले असून जीवन जगताना कोणते मूल्य अंगिकारावे हे सुद्धा सांगितले आहेत. या ग्रंथामुळे ग्रामीण भारताचा जीर्णोद्धार होऊ शकतो. हा ग्रंथ मनुष्याला सर्वांगीण दृष्टीने सुखी संपन्न करणारा असून या तत्त्वाचे पालन केल्यास प्रत्येक गाव आदर्श झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना या ग्रंथाचे वाचन आणि अवलोकन करण्यास सांगावे व एक सुसंस्कार पिढी घडविण्यास हातभार लावावा असे आव्हा. सुद्धा याप्रसंगी करण्यात आले.

तिरुपती विद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन



दै. लोकजन वृत्तसेवा

किन्ही (मोखे) :– जवळील ग्राम वडेगाव (खां.) येथील तिरुपती विद्यालय तथा स्व. निर्धनराव पाटील वाघाये कनिष्ठ कला महाविद्यालय, वडेगाव (खांबा) येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या सुरक्षित बालपण अभियान २०२६ अंतर्गत, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण या विषयावर कायदेविषयक मार्गदर्शन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य ए. एच. रहांगडाले होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून व्ही. एम. गायकवाड, दिवाणी न्यायाधिस साकोली तर प्रमुख अतिथी म्हणून पी. ए. सहारे, एल. ए. मल्लानी, प्रा. एम. आर. राऊत, प्रा. अनिल गहाणे, एन. एस. क्षिरसागर, के. पी. गहाणे, ए. बी. कापगते हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शकांनी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (POCSO Act), २०१२ याविषयी मार्गदर्शन केले. बालकांचे हक्क, बालकांवरील लैंगिक अत्याचाराचे प्रतिबंध, बालकांच्या सुरक्षिततेचे महत्त्व, तसेच अशा घटनांपासून संरक्षण मिळिवण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देण्यात आली. तसेच कोणत्याही अनुचित प्रसंगाची माहिती विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेला देण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये बालसुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना त्यांच्या हक्कांची माहिती देणे आणि सुरक्षित वातावरणाचे महत्त्व पटवून देणे हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. डब्ल्यू. कापगते यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. एम. आर. तुमसरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जगदीश खोब्रागडे, नंदकिशोर कांबळे, राजकुमार भानारकर, मनोहर केवट, ज्ञानवी कोटांगले, नागेश्वरी दडेमल, काजल ठाकरे, संध्या कावळे, आराध्या बडोले, माधुरी उईके, त्रिवेणी टेकाम, तन्वी केवट, डिम्पल बारबुद्धे, डिम्पल घरत, चैताली राऊत, रुचिका बडोले, प्रियंका बिसेन यांनी सहकार्य केले.

लाखनीत आयोजित होतो निसर्ग संदेश देणारा दांडिया व गरबा उपक्रम

❊ग्रीन नेचर फाउंडेशनचे अभिनव व अनोखे आयोजन
❊तसेच महिला व विद्यार्थ्यांना केले वृक्षांचे वाटप व वृक्षारोपण

दै. लोकजन वृत्तसेवा

लाखनी :– येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब लाखनी तर्फे वर्षभर चालणाऱ्या निसर्ग महोत्सव लाखनीच्या व पर्यावरणस्नेही नवरात्राचे निमित्ताने पाच दिवसीय पर्यावरणस्नेही ग्रीन गरबा व दांडियाचे निःशुल्क आयोजन नेचर पार्क जवळील दत्तनगर परिसरात करण्यात आले. महाराष्ट्रात अशाप्रकारे निसर्ग माहितीचा खजिना व पर्यावरण संदेश देणारे अभिनव व अनोखे अशा पर्यावरणस्नेही ग्रीन गरबा व दांडियाचे निःशुल्क आयोजन हे मागील पाच वर्षापासून प्रथमच होत आहे.



विशेष म्हणजे या ग्रीन गरबा व ग्रीन दांडियामध्ये मध्ये वृक्षदेवता ठेवून त्याभोवती वृक्षरोपे ठेवण्यात आली. तसेच सभोवताल हिरव्यागार गोलाकार घेऱ्यामध्ये सुद्धा सर्वत्र वृक्ष ठेवण्यात आले होते. एवढेच नव्हेतर गोलाकार घेऱ्यामध्ये सर्वच ठिकाणी पक्षी, प्राणी, फुलपाखरे व साप यांचे छायाचित्र व विविध पर्यावरणस्नेही नवरात्राचे, गरबा दांडियाचे संदेश देणारे घोषवाक्य सर्वत्र लावलेले फलक हे आकर्षणाचा केंद्रबिंदू होते ज्यामुळे प्रदर्शनी प्रमाणे सर्वांना माहिती मिळत होती. विशेष म्हणजे नवरात्रीच्या त्या दिवशीच्या रंगानुसार पक्षी, साप, प्राणी, फुलपाखरे व सरपटणारे प्राणी यांची सुद्धा माहिती त्या दिवशी दिली जात होती. या कार्यक्रमाला दत्तनगर रहिवासी तसेच लाखनी नगरपंचायतीचे नगरसेवक संदीप भांडारकर यांनी सहकार्य केले.

पाचही दिवस महिला, शाळकरी विद्यार्थी विद्यार्थीनी व निसर्गप्रेमी नागरिकांनी या निःशुल्क गरबा दांडियामध्ये निसर्गाच्या गाण्यावर तसेच गरबा दांडिया गाण्यावर गोल रिंगणात उत्स्फूर्त फेरी घेत गेले. यावेळी पाचही दिवस सहभागी महिला विद्यार्थी व निसर्गप्रेमी नागरिकांना निसर्गावर आधारित माहिती निसर्गमहोत्सव लाखनीचे आयोजक व ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यवाह प्रा. अशोक गायधने यांच्याकडून देण्यात आली व त्यांची निसर्ग प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामुळे सहभागीचे निसर्गातील प्रत्येक घटकावर माहिती होऊन त्यांच्यात निसर्गाप्रती कार्य करण्याची निसर्गसंवेदना जागृत झाली.

दररोज घेण्यात येणाऱ्या निसर्गप्रश्नमंजुषा मध्ये विजेत्या मुलांना पारितोषिके व कापडी पिशवी व प्रमाणपत्रे अतिथींच्या हस्ते वाटप करण्यात आली. शेवटच्या दिवशी सर्व सहभागी मुली, महिला, नागरिक व बालमंडळींना ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते भैय्याजी बावनकुळे, ज्येष्ठ नागरिक दिंगबर भांडारकर, पदाधिकारी अशोक वैद्य, अशोक नंदेश्वर, मनोहर गायधने व दिलीप बजाज यांचे हस्ते वृक्षवाटप करून त्यांचा महाराष्ट्रातील अभिनव व अनोखे अशा ग्रीन गरबा व दांडिया मध्ये उत्कृष्टपणे निसर्गावरील आधारित गीतावर फेर धरल्याबद्दल प्रेरित करण्यात आले. यासमारोप प्रसंगी मनोहर गायधने यांनी अनेक निसर्ग आधारित गीतगायन करून वातावरणात शालीनता व प्रसन्नता आणली. त्यानंतर उपस्थित महिलांचे हस्ते परिसरात अशोक व आपट्याच्या वृक्षारोपांचे नेचर पार्क जवळील दत्तनगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सर्वच सहभागीनी या ठिकाणी आयोजित शांत, सोज्वळ व साधेपणाने आयोजित केलेल्या पर्यावरणस्नेही ग्रीन गरबा व दांडिया मध्ये आपलेपणा व हवीहवीशी आपुलकी जाणवली असे प्रतिक्रिया व्यक्त केले. सहभागी बालमंडळींनी सुद्धा पाचही दिवस वेगवेगळे डान्स यानिमित्ताने सादर करून वातावरणात रोमांचकता आणली.

एक नजर राज्यावर....

✪ मोदींना हटवण्यासाठी मजबुतीने लढुयात. आपण एकत्र येऊन लढुयात. मोदींना हटवुयात. लोकशाहीला मजबूत करुयात. देशाला बळकट करूयात, असं आवाहन मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलं.

✪ बीड:वाल्मीक कराडचा मुलगा सुशील कराडने पीडित महिलेला धमकी दिल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे.

✪ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडिया आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. इंडिया आघाडीमधील नेत्यांकडून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

✪ इंडिया आघाडीच्या वतीने काढण्यात आलेल्या या महारॅलीला काँग्रेसचे नेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, यांच्यासह इंडिया आघाडीमधील सर्वच प्रमुख नेते उपस्थित होते.

✪ ज्ञानेश कुमारांशिवाय मोदी पंतप्रधान झालेच नसते, देशाच्या १५ टक्के मतदारांना मतदान यादीतून काढून टाकलं. २०२४ ची निवडणूक बेकायदेशीर होती, असा हल्लाबोल यावेळी राहुल गाधी यांनी केला आहे.

पृष्ठ क्र.१ वरून.....

वनरक्षक ..

केले. वनरक्षकाच्या कर्तव्यनिष्ठेला राष्ट्रीय सलाम! दुर्गम जंगलात प्रत्यक्ष काम करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांच्या योगदानाला मिळालेली ही पावती असून, वन्यजीव संवर्धनासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी ती निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

बनावट सिमकार्ड...

करण्यात आली. पोलीस निरीक्षक निलकंठ कुडकेंडे तपास करीत असून, सिमकार्डच्या गैरवापरातून उभ्या राहिलेल्या सायबर गुन्हेगारीचे जाळे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

ओबीसीचा डाटा नाही ...

कोराम, मनोज मेंढे, सुनील पटले,खेमेंद्र कटरे, कैलाश भेलावे, भूमेश शेंडे, अमर वर्हाडे,पुष्पा खोटेले, एस. यु. वंजारी, पंकज यादव, चंद्रकुमार बहेकार, रवी अंबुले, अजाबराव रिनायत, निखिल बनसोड, प्रकाश काकडे, गुड्डू लिल्हारे, सुनील तरोणे, राजेश नागरीकर, गंगाधर परशुरामकर, वाय.टी.कटरे, ओम पटले, विजय फुंडे, बंटी पंचबुद्धे, मनोज शरणागत, ओम कटरे, रवी पटले, गणेश बरडे, पप्पू पटले, भूमेश टाकरे, संतोष खोब्रागडे, सुरेंद्र सोनवणे, बी. एम. करमकर, सावन कटरे, तीर्थराज उके, रवी भांडारकर, अतुल सतदेवे, परेश दुरुगकर, विनायक येडेवार, कृष्णा ब्राह्मणकर, भोजराज फुंडे, नरेश परिहार, दिलीप गौतम, प्रकाश पटले, किशोर डोंगरवार, संदीप तिडके, खोमेंद्र रहांगडाले, मालती किन्नाके, सुरेंद्र खोब्रागडे, सविता बेदरकर यांच्यासह हजारो समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

महिलाच्या हातात ...

चालविणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे आणि यात महिलांचे कर्तृत्वाचा सन्मान राखण्याचे काम केले जाते. पक्षात महिलांचे नेतृत्व घडविण्यात लोकनेते स्व.अजितदादा पवारजी व आमचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांचे योगदान मोठे आहे. यावेळी गोंदिया जिल्ह्यातील महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्ष पदाधिकारी कार्यकर्त्या वरिष्ठ पदाधिकारी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पदाधिकारी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत व परिषदेतील सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस दलाच्या मैदानावर कौशल्याचा जल्लोष; आमगाव पुरुषांत, तर पोलीस मुख्यालय महिला गटात अजिंक्य!

२५ व्या जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धेचा उत्साहात समारोप; खेळातून एकोपा, शिस्त आणि संघभावनेचा संदेश

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :- पोलीस दलाची ओळख केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे आणि जनतेचे संरक्षण करणारे दल एवढ्यापुरती मर्यादित नाही, तर शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, खिलाडूवृत्ती आणि संघभावनेतूनही पोलीस दल आपली वेगळी ओळख निर्माण करीत असते. याच गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या २५ व्या जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. पुरुष गटात आमगाव उपविभागाच्या संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावली, तर महिला गटात पोलीस मुख्यालय गोंदिया संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

पोलीस मुख्यालयाच्या कारंजा येथील कवायत मैदानावर २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गोंदिया, आमगाव, देवरी व तिरोडा उपविभागांसह पोलीस मुख्यालय गोंदिया अशा पाच संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. पाच दिवस चाललेल्या या क्रीडा महोत्सवात खेळाडू पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी आपले क्रीडाकौशल्य पणाला लावत मैदानावर चुरशीची लढत दिली.

स्पर्धेमध्ये फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हँडबॉल आणि कबड्डी या सांघिक खेळांसह ज्युडो, कुस्ती व ॲथलेटिक्ससारख्या वैयक्तिक खेळांचा समावेश होता. प्रत्येक खेळात विजयासाठीची जिद्द, शिस्तबद्ध खेळ आणि संघातील समन्वय दिसून आला. कर्तव्याच्या धावपळीतून वेळ काढत पोलीस कर्मचाऱ्यांनी खेळाच्या मैदानावर दाखविलेला उत्साह विशेष लक्षवेधी ठरला.



पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप व बक्षीस वितरण सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करताना अशा स्पर्धांमुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या क्रीडागुणांना वाव मिळतो. शारीरिक क्षमता वाढण्याबरोबरच परस्परांमध्ये एकोपा, संघभावना आणि खिलाडूवृत्ती विकसित होते, असे प्रतिपादन केले.

आमगाव उपविभागाने पुरुष गटातील जनरल चॅम्पियनशिप, तर पोलीस मुख्यालय गोंदियाने महिला गटातील विजेतेपद मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. आता गडचिरोली येथे होणाऱ्या परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत आणि त्यानंतरच्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेतही गोंदिया जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक भामरे यांनी केले.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, पोलीस उपअधीक्षक सुनील दर्वेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशचंद्र शुक्ला, गजानन गुल्हाने, राजेश तटकरे यांच्यासह पोलीस अधिकारी, ठाणेदार व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मपोहवा मंगला प्रधान यांनी केले, तर आभार सुनील दरेकर यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी पोलीस मुख्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कर्तव्याबरोबरच क्रीडाक्षेत्रातही आपली क्षमता सिद्ध करणाऱ्या पोलीस दलाच्या या स्पर्धेने शिस्त, आरोग्य आणि एकजुटीचा प्रेरणादायी संदेश दिला.

ग्रामपरिवर्तनाचा विचार आजही दिशादर्शक; राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन!

व्ही.कौसल्यायन महिला महाविद्यालयात पुण्यतिथी साजरी; ग्रामगीतेतील विचारांचा जागर, सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया:- समाजप्रबोधन, ग्रामविकास, स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवतेचा संदेश आपल्या कीर्तनातून व प्रबोधनपर कार्यातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचे स्मरण करीत देवरी येथील व्ही. कौसल्यायन महिला महाविद्यालयात ३० ऑक्टोबर रोजी त्यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. यानिमित्ताने राष्ट्रसंतांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्याला उजाळा देण्यात आला.



महाविद्यालयाचे प्राचार्य अमित भूते यांच्या अध्यक्षतेखाली हा अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी शिल्पा राऊत, प्रा. आय. जी. कोसरे, प्रा. बी. एस. उईके आणि प्रा. बी. एस. बिसेन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन राष्ट्रसंतांना आदरांजली अर्पण केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ अध्यात्मिक संत नव्हते, तर समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक विषमतेविरुद्ध जनजागृती करणारे प्रभावी समाजसुधारक होते. त्यांनी कीर्तनाला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनवून सामान्य माणसाला स्वच्छता, शिक्षण, एकता, स्वावलंबन आणि श्रमाच्या प्रतिष्ठेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथातून आदर्श गावनिर्मितीचा व्यापक विचार मांडण्यात आला आहे.

आज ग्रामीण भागातील विकास, सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन आणि लोकसहभागाची गरज लक्षात घेता राष्ट्रसंतांचे विचार अधिकच महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही शैक्षणिक संस्थांचीही महत्त्वाची जबाबदारी आहे.

पुण्यतिथीच्या निमित्ताने राष्ट्रसंतांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते प्रत्यक्ष जीवनात रुजविणे, हाच त्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने अभिवादन करण्याचा मार्ग असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

अर्जुनी-मोर येथे ६ नोव्हेंबरपासून तिसरे श्रामणेर शिबिर

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दहा दिवसीय शिबिराचे आयोजन; भदन्त डॉ. बी. सुमेध बोधीजी यांचे मार्गदर्शन

दै.लोकजन वृत्तसेवा

अर्जुनी-मोर.:- भारतीय बौद्ध महासभा शाखा तालुका अर्जुनी-मोर यांच्या वतीने तिसऱ्या श्रामणेर शिबिराचे आयोजन ६ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. अर्जुनी-मोर येथील समता कॉलनी परिसरातील विश्वशांती बौद्ध विहार येथे हे दहा दिवसीय शिबिर पार पडणार आहे.

या शिबिरात मुंबई येथील भदन्त डॉ. बी. सुमेध बोधीजी यांचे मार्गदर्शन लाभणार असून, शिबिर प्रशिक्षक म्हणून राहुल हेलोडे गुरुजी (मुंबई) मार्गदर्शन करणार आहेत. १५ ते ४० वर्षे वयोगटातील युवकांना या शिबिरात सहभागी होता येणार आहे.

मानवी मूल्यांची जोपासना, तथागत भगवान बुद्धांच्या धम्मविचारांचा प्रसार, निर्व्यसनी जीवन, सुख-समृद्धी, आरोग्य व शिक्षणाचे महत्त्व याबाबत युवकांमध्ये जागृती निर्माण करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. तसेच महिला सन्मान, समानता आणि सामाजिक बंधुभावाची संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे.आजच्या धकाधकीच्या जीवनात युवकांनी व्यसनांपासून दूर राहून सदाचारी, शिस्तबद्ध व संस्कारक्षम जीवन जगावे, बुद्धांच्या विचारांचा अंगीकार करावा आणि समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पथनाट्यातून भ्रष्टाचारावर प्रहार; विद्यार्थ्यांनी दिला लाचखोरीविरोधी जागर; एन.एम.डी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पुढाकार

बसस्थानक, जयस्तंभ चौक आणि रेल्वेस्थानकावर जनजागृती, लाच मागितल्यास तक्रार करण्याचे एसीबीचे आवाहन

दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया : – भ्रष्टाचार ही केवळ प्रशासकीय व्यवस्थेतील समस्या नसून ती समाजाच्या प्रगतीला बाधा आणणारी गंभीर प्रवृत्ती आहे. शासकीय कामांसाठी लाचेची मागणी, सामान्य नागरिकांची होणारी आर्थिक पिळवणूक आणि भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करण्याबाबत असलेली भीती दूर करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांच्या वतीने दक्षता जनजागृती सप्ताहांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात एन.एम.डी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून भ्रष्टाचाराविरोधात प्रभावी जनजागृती केली.



शुक्रवारी ३० ऑक्टोबर रोजी गोंदिया शहरातील मध्यवर्ती बसस्थानक, जयस्तंभ चौक आणि रेल्वेस्थानक अशा नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून लाचखोरीचे दुष्परिणाम, सामान्य नागरिकांची होणारी गैरसोय आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या प्रवृत्तीवर भाष्य केले. या सादरीकरणातून लाच देणे आणि लाच घेणे दोन्ही कायद्याने गुन्हा असल्याचा संदेश देण्यात आला.

शासकीय कार्यालयात एखादे काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त पैशांची मागणी झाल्यास नागरिकांनी घाबरून न जाता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवकांच्या माध्यमातून भ्रष्टाचारासारख्या संवेदनशील विषयावर सार्वजनिक ठिकाणी संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न विशेष महत्त्वाचा ठरला.

दक्षता जनजागृती सप्ताहाचा मुख्य उद्देश शासकीय कामकाजात पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि उत्तरदायित्व वाढविणे हा आहे. मात्र, भ्रष्टाचार विरोधातील लढा केवळ सरकारी यंत्रणेपुरता मर्यादित राहून चालणार नाही. नागरिकांनीही लाच देण्यास नकार देऊन अन्यायाविरोधात आवाज उठविणे आवश्यक आहे.

तक्रारीसाठी संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांचा टोल फ्री क्रमांक १०६४, व्हॉट्सॲप क्रमांक ९२०९०४१०६४, कार्यालयीन दूरध्वनी ०७१८२-२५१२०३ उपलब्ध आहेत. तसेच पोलीस निरीक्षक उमाकांत उगले (९६६४९५९०९०) आणि अरविंद राऊत (८२७५२९८४७५) यांच्याशी संपर्क साधता येईल.

लाच देऊ नका, लाच घेऊ नका, तर भ्रष्टाचारमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जागरूक नागरिक म्हणून पुढाकार घ्या, हाच या पथनाट्याचा मुख्य संदेश ठरला.

सरदार पटेल जयंती, इंदिरा गांधी पुण्यतिथीनिमित्त गोंदिया पोलिसांचे अभिवादन!

राष्ट्रीय संकल्प दिन आणि एकता दिनानिमित्त प्रतिमापूजन, भाषणातील उताऱ्याचे वाचन व सामूहिक शपथ



दै.लोकजन वृत्तसेवा

गोंदिया :- देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्यांचे स्मरण करून देणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गोंदिया पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवारी ३१ ऑक्टोबर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय संकल्प दिनाचे औचित्य साधून इंदिरा गांधी यांच्या शेवटच्या भाषणातील निवडक उताऱ्याचे वाचन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली. पोलीस अधीक्षकांसह उपस्थित पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी सामूहिकरीत्या शपथेचे वाचन करून देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी उपस्थितांना सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या जीवनकार्याची तसेच राष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाची संक्षिप्त माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय महापुरुषांच्या विचारांचे स्मरण आणि देशाप्रती कर्तव्यनिष्ठेची जाणीव करून देणारा हा उपक्रम पोलीस दलासाठी प्रेरणादायी ठरला.

अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करा - आ. राजकुमार बडोले यांची मागणी

रोहयो मंत्री भरत गोगावले यांची मंत्रालयात भेट; मोठ्या प्रमाणात कुशल कामे सुरू करण्याचे आश्वासन

दै.लोकजन वृत्तसेवा

अर्जुनी मोरगाव :- यावर्षी पावसाने दडी मारल्यामुळे तसेच पिकांवर रोग व किडींचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे. परिणामी ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर आर्थिक संकटात सापडले असून, रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी व गोरेगाव या तीनही तालुक्यांमध्ये जी रामजी रोजगार हमी योजनेअंतर्गत तसेच अकुशल कामांना तातडीने सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी आमदार राजकुमार बडोले यांनी केली आहे.



यासंदर्भात आमदार राजकुमार बडोले यांनी दिनांक २८ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील मंत्रालयात राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना. भरत गोगावले यांची त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण भागातील दुष्काळसदृश परिस्थिती, शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान आणि शेतमजुरांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न याबाबत मंत्र्यांचे लक्ष वेधले. तसेच तिन्ही तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करण्याबाबत निवेदन सादर केले.

यावर्षी पावसाचे प्रमाण अनियमित राहिल्याने अनेक भागांतील पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यातच रोग व किडींच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटुंबांना सध्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावागावांत कामे उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळून आर्थिक दिलासा मिळू शकतो, अशी भूमिका आमदार बडोले यांनी मांडली.

आमदार बडोले यांच्या निवेदनाची दखल घेत रोहयो मंत्री ना. भरत गोगावले यांनी यावर्षी रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात अकुशल कामे हाती घेण्यात येतील, तसेच निधीची कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही, असे आश्वासन दिले. मंत्र्यांच्या या सकारात्मक आश्वासनामुळे अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी व गोरेगाव या तीनही तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि बेरोजगार कुटुंबांना आगामी काळात रोजगाराची संधी मिळून आर्थिक संकटातून काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मराठी दैनिक लोकजन मालक, मुद्रक,प्रकाशक व संपादक दिलीप पारधी यांनी हे वृत्तपत्र लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वार्ड, भंडारा येथून मुद्रित करून लोकजन कार्यालय,लोकजन भवन, डॉ. लोहिया वार्ड, टी. बी. टोली गोंदिया येथे प्रकाशित केले. संस्थापक - एच. एच. पारधी, मुख्य संपादक- दिलीप एच. पारधी, भ्रमणध्वनी ९९७५०४७६३५, ९४२३११३०३३, ई-मेल-lokjanprakashan@gmail.com (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.) प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख व स्तंभलेखन यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमतच असतील असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)